
आचार्य श्री योगींदुदेव विरचित

# योगसार

(मराठी)



आचार्य श्री योगींदुदेव विरचित

# योगसार

पद्यानुवाद

**पं. श्री मधुकर गडेकर**

एम. ए., बी. एड., साहित्यरत्न, नागपूर

संपादन व अनुवाद

**ब्र. यशपाल जैन**

एम. ए., जयपूर


प्रकाशक

**पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट**

ए-४, बापूनगर, जयपूर (राजस्थान) ३०२०१५

फोन : (०१४१) २७०५५८१, २७०७४५८

फॅक्स : (०१४१) २७०४१२७

E-mail : ptstjaipur@yahoo.com

**प्रथम आवृत्ती** : ३०००
(पताशे प्रकाशन संस्था, घटप्रभा (कर्नाटक) द्वारा प्रकाशित)
**द्वितीय आवृत्ती** : २०००
पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपुर
**तृतीय आवृत्ती** : ६००
(पताशे प्रकाशन, घटप्रभा द्वारा प्रकाशित)
**चतुर्थ आवृत्ती** : १०००
पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपुर
(**महावीर जयंती** दिनांक ३.४.२००४)
**पांचवी आवृत्ती** : २०००
पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपुर
दीपावली : दिनांक ३ नोव्हेम्बर २०१३
**एकूण** : ८६००

**स्वर्गीय श्री शांतिनाथ सोनाज, अकलूज यांच्या स्मरणार्थ**
***सोनाज परिवारातर्फे सस्नेह भेंट***

मूल्य : **१० रुपये**

**या आवृत्तीला अल्पमूल्यात उपलब्ध करून देणाऱ्या दातारांची नामावली**

| | |
|---|---|
| १) श्री सागर गाड़ेकर, औरंगाबाद | ५००.०० |
| २) सौ. प्रतिभा नंदकुमार सोईंलकर, औरंगाबाद | ५००.०० |
| ३) श्रीमती प्रतिभा राजेन्द्रकुमार जैन, बांद्रा | ५००.०० |
| ४) सौ. सविता भरत भांगे, वसई | ५००.०० |
| ५) गुप्तदान | ५००.०० |
| ६) डॉ. हुकमचंदजी संगवे, सोलापूर | २००.०० |
| ७) श्री पुनीत मेहता, औरंगाबाद | २००.०० |
| **एकूण** : | **२९००.००** |

अक्षरजुळवणी :
**त्रिमूर्ती कॉम्प्यूटर्स**
ए-४, बापूनगर, जयपूर

मुद्रक :
**श्री प्रिन्टर्स**
मालवीयनगर, जयपुर

# प्रकाशकीय

आम्ही ही योगसार की पांचवी आवृत्ती आपल्या करकमली देताना विशेष आनंदाचा अनुभव करीत आहोत. यावरून समाजामध्ये तात्त्विक रुची वाढत आहे, याचा आम्हाला दृढ विश्वास होत आहे.

**पंडित टोडरमल स्मारक ट्रस्टचे** कार्यक्षेत्र केवळ भारत देशच नव्हे तर विदेशातही वीतरागी जिनेंद्र कथित अलौकिक तत्त्वज्ञान पोहचविण्याचा सतत प्रयत्न या संस्थेद्वारे चालू असतो. **या संस्थेचे महामंत्री तत्त्ववेत्ता डॉ. हुकमचंद भारिल्ल गेल्या ३० वर्षांपासून प्रत्येक वर्षी विदेशात जिनधर्माच्या प्रचारासाठी जात आहेत.**

आमची ही संस्था हिंदी, मराठी, गुजराथी, कन्नड, इंग्रजी इत्यादी अनेक भाषांमध्ये साहित्य प्रकाशित करीत असते.

या योगसार ग्रंथाला मराठी भाषेत गद्य-पद्य अनुवादासह सर्वप्रथम प्रकाशित करण्याचे पवित्र कार्य **अध्यक्षा – सौ. इंदुमती अण्णासाहेब खेमलापुरे घटप्रभा (जि. बेळगांव, कर्नाटक) पताशे प्रकाशन संस्थेने केले** आहे. त्यांच्याद्वारे प्रकाशित ३००० प्रति आचार्य कुंदकुंद द्विसहस्राब्दी वर्षातच संपल्या होत्या. अनेक वर्षांपासून या ग्रंथाची मागणी वाचकांकडून होती, म्हणून आम्ही पुन्हा ही पांचवी आवृत्ती प्रकाशित करीत आहोत.

हे पुस्तक अल्पमूल्यात आपल्या हाती देण्यासाठी योगायोगाने आम्हाला अपेक्षित दातारही लाभले आहेत, त्यांची यादी देखील पुस्तकात दिलेली आहे, त्या दातारांना हार्दिक धन्यवाद. पुन्हा प्रकाशनासाठी दातारांचा सहयोग सतत मिळेल, असा विश्वास आहे. दान देण्याची ज्यांची भावना असेल त्यांनी अवश्य संपर्क करावा.

प्रस्तुत प्रकाशनाचे मराठी पद्यानुवाद करण्याचे कार्य नागपूर निवासी कविराज **श्री मधुकर गडेकरांनी** केले आहे. त्याचप्रमाणे आकर्षक मुखपृष्ठ, सुंदर छपाईसाठी श्री अखिल बंसल व अक्षरजुळवणीच्या कष्टसाध्य कार्यासाठी श्री श्रुतेश सातपुते शास्त्री, डोणगांव आणि जितेंद्र राठी शास्त्री, पारशिवनी यांनी सहयोग दिल्याबद्दल आम्ही सर्वांचे हार्दिक आभारी आहोत. श्री

शांतिकुमार पाटील जैनदर्शनाचार्य, जयपूर यांच्या विशेष सहयोगाचा उल्लेख देखील अनिवार्य आहे.

या पाचव्या आवृत्तीसाठी कम्पोजचे कष्टसाध्य कार्य श्री कैलाशचन्द शर्मांने केले आहे; त्यांना धन्यवाद।

वाचक या प्रकाशनाचा लाभ घेतील या विश्वासासह –

**– ब्र. यशपाल जैन,** एम. ए.

प्रकाशन मंत्री, पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट

**योगसारच्या या पाचव्या आवर्त्तीमध्ये खालील नवीन विषय आलेला आहे –**

१. डॉ. वीरसागर जैन (दिल्ली) द्वारा संपादित योगसारच्या आधारे अपभ्रंष भाषेमध्ये सुधार केला आहे.

२. डॉ. वीरसागर द्वारा लिखित योगसार प्रश्नोत्तरीचा मराठी अनुवाद जोडला आहे.

३. मागील आवृत्तीपेक्षा या पाचव्या आवृत्तीचा टाईप मोंठा केला आहे.


# आमची मराठी प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| समयसार ज्ञायकभाव प्रबोधिनी | ५० रुपये | निमित्तोपादान | ५ रुपये |
| समयसार अनुशीलन भाग : १ | २५ रुपये | पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव | ५ रुपये |
| प्रवचनसार अनुशीलन भाग : १ | ३० रुपये | जिनेंद्र पूजेचे स्वरूप | ३ रुपये |
| प्रवचनसार अनुशीलन भाग : २ | ३० रुपये | मी स्वत: भगवान आहे | ५ रुपये |
| समयसाराचा सार | २५ रुपये | जिनपूजन रहस्य | ५ रुपये |
| जिनेंद्र अष्टक | २५ रुपये | गोळीचे उत्तर शिवीने सुद्धा नाही | ५ रुपये |
| ह्या परिणामांचे फळ काय मिळेल | १५ रुपये | योगसार | १० रुपये |
| हा विचार तर केलाच नाही | १५ रुपये | ध्यानाचे स्वरूप | ४ रुपये |
| छहढालाचा सार | १५ रुपये | जैन नर्सरी | १० रुपये |
| संस्कार | १२ रुपये | जैन केजी (भाग १, २ व ३) | ५१ रुपये |
| बारा भावना : एक अनुशीलन | १० रुपये | बालबोध पाठमाला भाग : १,२,३ (सेट) | ८ रुपये |
| क्रिया, परिणाम आणि अभिप्राय | १० रुपये | वीतराग-विज्ञान पाठमाला भाग : १,२,३(सेट) | १० रुपये |
| अखेरचा निरोप | ८ रुपये | कुंदकुंद शतक | १.२५ रुपये |
| जिनधर्म प्रवेशिका (गद्य-पद्यसहित) | ७ रुपये | शाकाहार : जैन धर्माच्या | १ रुपया |
| सामान्य श्रावकाचार | ६ रुपये | दृष्टीकोणातून | १ रुपया |
| णमोकार महामंत्र | ६ रुपये | | |

# संपादकीय

आचार्य श्री योगींदुदेव विरचित योगसार परम आध्यात्मिक शास्त्र आहे. निश्चय सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र अर्थात् शुद्धात्म साधनेचे स्वरूप या ग्रंथात उत्तम रीतीने समजाऊन सांगितले आहे. **जीवाच्या व्यक्त ज्ञानशक्तीला अनादी-अनंत, स्वाभाविक, शुद्धात्म स्वभावामध्ये गुंतवणे/जोडणे म्हणजेच योग होय.** असा योग साधावा यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे. म्हणून या ग्रंथाचे 'योगसार' असे सार्थक नाव आहे. यामध्ये एकूण १०८ अपभ्रंश भाषेचे दोहे आहेत.

**योगसारचा विषय :** योगसारचा प्रतिपाद्य विषय अध्यात्म आहे. ग्रंथारंभी सिद्ध तथा अरहंत भगवंतांना नमस्कार केला आहे. संसारापासून भयभीत जीवांना शुद्धात्म-स्वरूपाचे ज्ञान करून देणे हा या ग्रंथाचा मूळ उद्देश्य आहे. अनादी काळापासून अज्ञानी जीव केवळ मिथ्यादर्शनामुळेच (विपरीत श्रद्धेमुळेच) मुख्यत: दु:खी आहेत. यासाठी चतुर्गतीतील दु:खाने भयभीत/संत्रस्त जीवांना समस्त पर-भावांचा त्याग करून एकमात्र निज शुद्धात्म्याचे मनन-चिंतन/ध्यान करणे, हाच वास्तविक मोक्ष सुखाचा एकमेव उपाय आहे.

आत्म्याच्या बहिरात्मा, अंतरात्मा आणि परमात्मा अशा तीन अवस्था/पर्याय असून देहादी परद्रव्यांना आत्मा वा आत्मस्वरूप मानणे म्हणजे **बहिरात्मपणा** आहे. स्व-पराचा निर्णय करून निजशुद्धात्म्याचे श्रद्धान करणारा जीव **अंतरात्मा** समजावा. अंतरात्माच निज शुद्धात्म्यामध्ये स्थिर होणेरूप पुरुषार्थ करून **परमात्मा** (अरहंत/सिद्ध) बनतो. दोहा क्रमांक ४२, ४३, ४४ आणि ४५ मध्ये आचार्य श्री योगींदुदेव **देंहा देवलि देउ जिणु** – देहरूपी देवालयामध्ये जिनदेव विराजमान आहेत – असे स्पष्ट शब्दात वारंवार सांगतात.

पुढे आचार्य पुन्हा लिहितात – तत्त्व जाणणारे विरळे आहेत, तत्त्व ऐकणारे त्याहून विरळे आहेत, आत्म-तत्त्वाचे यथार्थ ध्यान करणारे त्याहूनही विरळे आहेत आणि तत्त्वार्थाला धारण करणारे तर अतिशय विरळे आहेत. पिंडस्थादी ध्यानाचा देखील नाम मात्र उल्लेख केला आहे. सामायिकादी चारित्राचे कथन अति संक्षेपात केले आहे.

आतापर्यंत जेवढे जीव सिद्ध झालेले आहेत, वर्तमानकाळी सिद्ध होत आहेत आणि पुढे जेवढे सिद्ध होतील, ती सर्व महिमा एका आत्म-दर्शनाचीच आहे. याप्रमाणे योगसार ग्रंथाचा मूळ उद्देश्य आत्म-दर्शन/आत्मानुभव करविणे हा आहे. म्हणून **समयसारचा सार म्हणजेच योगसार** असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

**ग्रंथकाराचा परिचय :** प्रात:स्मरणीय आचार्य श्री कुंदकुंदांच्या अध्यात्म परंपरेतील एक विशेष प्रभावी व विरक्त चित्तधारी मुनिपुंगव म्हणजेच आचार्य श्री योगींदुदेव होत. हे आत्मानुभवी तथा अध्यात्म विद्येचे तलस्पर्शी विद्वान होते. आचार्य कुंदकुंदांप्रमाणे आचार्य श्री पूज्यपाद देखील यांचे प्रेरणास्रोत होते, ही बाब त्यांच्या साहित्यावरून लक्षात येते.

साधारणत: १४०० वर्षांपूर्वी म्हणजेच पाचव्या शतकाच्या शेवटी किंवा सहाव्या शतकाच्या प्रारंभी आचार्य श्री योगींदुदेवांनी या भारत भूमीला आपल्या चरण स्पर्शाने पवित्र केले होते, असे इतिहासकारांचे अनुमान आहे. त्यांचे माता-पिता, जन्मगांव किंवा प्रांत इत्यादी संबंधी काहीही माहिती आतापर्यंत उपलब्ध झालेली नाही.

विद्वत् समाजात खास प्रचलित संस्कृत आणि प्राकृत भाषा सोडून जनसामान्यामध्ये प्रचलित अशा अपभ्रंश भाषेत योगसार ग्रंथाची रचना केली आहे. यावरून जनसामान्यांना आत्मबोध करविण्याचा आचार्यश्रींचा करुणाभाव स्पष्ट होतो.

**नाव :** आचार्यश्री साठी योगींदु शिवाय जोगींदु, जोगिचंद, योगेंद्र, योगींद्रचंद्र इत्यादी नावांचा देखील उल्लेख मिळतो. जोइंदु या अपभ्रंश शब्दाचे संस्कृत रूप योगींदु असे आहे.

**साहित्य रचना :** परमात्मप्रकाश, योगसार, नौकार श्रावकाचार हे ग्रंथ अपभ्रंश भाषेत तर अध्यात्म-संदोह, सुभाषित-तंत्र व तत्त्वार्थ-टीका हे तीन ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले आहेत. याशिवाय पाहुड दोहा (अपभ्रंश), अमृताशीति (संस्कृत) आणि निजात्म-अष्टक (प्राकृत) हे ग्रंथ आचार्य श्री योगींदुदेव रचित आहेत; असा विद्वानांचा अभिप्राय आहे.

आचार्यश्रींच्या मूळ उद्देशाला स्पष्ट करीत अन्वयार्थ, सामान्यार्थ आणि आवश्यक तेथे भावार्थ लिहून हे संस्करण मराठी भाषेत तयार केले आहे. योगसार टीकेसह प्रसिद्ध व्हावे ही हार्दिक भावना आहे, याचा निर्णय भविष्यकाळच करील.

**– ब्र. यशपाल जैन**

।। श्री परमात्मने नमः ।।

आचार्य श्री योगींदुदेव विरचित

# योगसार

**श्री सिद्ध परमेष्ठींना नमस्कार –**

**णिम्मल–झाण–परिट्ठिया, कम्मकलंक डहेवि ।**
**अप्पा लद्धउ जेण परु, ते परमप्प णवेवि ।।१।।**

ज्यांनी निर्मल ध्यानाने, कर्मकलंक दग्ध केले।
त्या परमात्मा सिद्धांच्या, चरणी मम मस्तक नमले ।।१।।

**अन्वयार्थ : (जेण)** ज्यांनी **(णिम्मल–झाण–परिट्ठिया)** निर्मल ध्यानामध्ये स्थिर होऊन **(कम्मकलंक डहेवि)** कर्मरूपी कलंकाला जाळून टाकले आहे **(परू अप्पा लद्धउ)** व परमात्मपद प्राप्त केले आहे **(ते परमप्प णवेवि)** अशा त्या सिद्ध परमात्म्यांना मी (योगींदुदेव) नमस्कार करतो.

**सामान्यार्थ :** ज्यांनी निर्मल ध्यानामध्ये पूर्णता स्थिर होऊन कर्मरूपी कलंकाला जाळून टाकले आहे व परमात्मपद प्राप्त केले आहे,

अशा त्या परमात्मपद प्राप्त सिद्ध भगवंतांना (श्री योगींदुदेव योगसार ग्रंथ प्रारंभ करण्यापूर्वी ) नमस्कार करतात.

**श्री अरहंत परमेष्ठींना नमस्कार-**

**घाइ-चउक्कहँ किउ विलउ, णंत-चउक्क-पदिट्ठु ।**
**तहिं जिणइंदहँ पय णविवि, अक्खमि कव्वु सुइट्ठु ।।२।।**

चार घातिया क्षय करूनी, धारि अनंत चतुष्टय ते ।
सुंदर काव्य मधुर लिहितो, वंदुनि श्री जिनवर पद ते ।।२।।

**अन्वयार्थ : (घाइ-चउक्कहँ किउ विलउ)** ज्यांनी चार घातिया कर्मांचा क्षय/नाश केलेला आहे **(णंत-चउक्क-पदिट्ठु)** तसेच अनंत चतुष्टयाची प्राप्ती करून घेतली आहे **(तहिं जिणइंदहँ)** अशा त्या जिनेंद्र भगवंतांना **(णविवि)** नमस्कार करून **(सुइट्ठु कव्वु)** अति हितकारक काव्य **(अक्खमि)** सांगतो/रचतो.

**सामान्यार्थ :** ज्यांनी चार घाति कर्मांचा नाश केलेला आहे. तसेच अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख आणि अनंत वीर्य या अनंत चतुष्टयाची प्राप्ती करून घेतली आहे, अशा त्या अरहंत जिनेंद्र पदास नमस्कार करून भव्य जीवांना अतिशय हितकारक अशा काव्याची (मी योगींदुदेव) रचना करतो.

**भावार्थ :** ज्ञानावरण इत्यादी आठ कर्मांचा नाश झाल्यामुळे सिद्ध पदाची प्राप्ती होते व ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय या चार घाति कर्मांचा नाश झाल्यामुळे केवलज्ञान प्राप्तीसह जिनेंद्र अर्थात अरहंत पदाची प्राप्ती होते – हा नियम आहे.

**ग्रंथ-रचनेचे निमित्त व प्रयोजन –**

**संसारहँ भय-भीयहँ, मोक्खहँ लालसियाहँ ।**
**अप्पा-संबोहण-कयइ, कय दोहा एक्कमणाहँ ।।३।।**

भव भीती ज्यांना आहे, मोक्षाची इच्छा आहे ।
त्यांच्या हितार्थ दृढ चित्ते, ग्रंथ हाच लिहिला आहे ।।३।।

**अन्वयार्थ : (संसारहँ भय-भीयहँ)** संसार दुःखापासून भयभीत झालेल्या व **(मोक्खहँ लालसियाहँ)** मोक्षप्राप्तीची लालसा बाळगणाऱ्या **(अप्पा-संबोहण-कयइ)** जीवांना आत्मसंबोधन करण्याच्या उद्देशाने **(एक्कमणाहँ)** एकाग्र मनाने **(कय दोहा)** दोहा पद्यांची रचना केली आहे.

**सामान्यार्थ :** चतुर्गतीरूप संसार दुःखाने भयभीत झालेल्या व मोक्षप्राप्तीची लालसा बाळगणाऱ्या अशा पात्र जीवांना आत्मसंबोधन करण्याच्या उद्देशाने एकाग्र मनाने ह्या दोहा पद्यांची रचना केली आहे.

**संसाराचे कारण मिथ्यादर्शन-**

**कालु अणाइ अणाइ जिउ, भवसायरु जि अणंतु।**
**मिच्छादंसण-मोहियउ, ण वि सुह दुक्ख जि पत्तु।।४।।**

काळ चक्र भवसागर अनु, जीव अनादि अनंत असे।
मिथ्यात्वाने सुख न मिळे, जीव दुःख नित भोगतसे।।४।।

**अन्वयार्थ : (कालु अणाइ)** काळ अनादी आहे **(जिउ अणाइ)** जीव अनादी आहे **(भवसायरु जि अणंतु)** संसार-सागर देखील अनादी-अनंत आहे **(मिच्छादंसण-मोहियउ)** मिथ्यादर्शनामुळे मोहित जीवाने **(सुह ण वि दुक्ख जि पत्तु)** सुख नाही तर दुःखच प्राप्त केले आहे.

**सामान्यार्थ :** काळ अनादी-अनंत आहे, जीव अनादी अनंत आहे आणि संसार-सागर देखील अनादी-अनंत आहे. अनंत मिथ्यादर्शनामुळे मोहित जीवाने (अनादी काळापासून आतापर्यंत) सुख नाही तर केवळ दुःखच प्राप्त केले आहे.

**मोक्ष सुखाचे कारण आत्मध्यान-**

**जइ बीहउ चउ-गइ-गमणु, तउ पर भाव चएहि।**
**अप्पा झायहि णिम्मलउ, जिम सिवसुक्ख लहेहि।।५।।**

जर भव भ्रमणाची भीती, तर सोडा पर भावाला।
निर्मल आत्मध्यान धरूनी, प्राप्त करा शिव सौख्याला।।५।।

**अन्वयार्थ : (जइ)** जर **(चउ-गइ-गमणु बीहउ)** चतुर्गतीच्या भ्रमणाने भयभीत असाल **(तउ)** तर **(पर भाव चएहि)** परभाव सोडून द्या **(णिम्मलउ अप्पा झायहि)** निर्मल आत्म्याचे ध्यान करा **(जिम)** ज्यायोगे **(सिवसुक्ख लहेहि)** तुम्ही मोक्ष सुखाची प्राप्ती करू शकाल.

**सामान्यार्थ :** जर तुम्ही चतुर्गतीच्या भ्रमणाने भयभीत झाला असाल तर शुभाशुभरूप परभावांना सोडून द्या व निर्मल आत्म्याचे ध्यान करा, ज्यायोगे मोक्षसुखाची प्राप्ती होईल.

**आत्म्याचे तीन भेद -**

**ति पयारो अप्पा मुणहि, परु अंतरु बहिरप्पु।**
**पर झायहि अंतर-सहिउ, बाहिरु चयहि णिभंतु ।।६।।**

त्रिविध आतमा जाणुनिया, बाहिरात्म्याचा त्याग करा।
अंतर आत्मा होऊनिया, परमात्म्याचे ध्यान धरा ।।६।।

**अन्वयार्थ : (परु)** परमात्मा **(अंतरु)** अंतरात्मा **(बहिरप्पु)** बहिरात्मा **(अप्पा ति पयारो मुणहि)** असे आत्म्याचे तीन प्रकार जाणा, **(णिभंतु)** भ्रांतीरहित होऊन **(बाहिरु चयहि)** बहिरात्मपणाचा त्याग करा, **(अंतर-सहिउ)** अंतरात्मा बनून **(पर झायहि)** परमात्म्याचे ध्यान करा.

**सामान्यार्थ :** परमात्मा, अंतरात्मा आणि बहिरात्मा - असे आत्म्याचे तीन प्रकार जाणा आणि भ्रांतीरहित होऊन बहिरात्मपणाचा त्याग करा. हे भव्य ! अंतरात्मा बनून परमात्म्याचे ध्यान करा.

**बहिरात्म्याचे स्वरूप-**

**मिच्छादंसण-मोहियउ, परु अप्पा ण मुणेइ।**
**सो बहिरप्पा जिणभणिउ, पुण संसारु भमेइ ।।७।।**

मिथ्यात्वाने जीवाला, स्व-पर ज्ञान कधि होत नसे।
तो बहिरात्मा संसारी, फिरतो हे जिन वचन असे ।।७।।

**अन्वयार्थ : (मिच्छादंसण-मोहियउ)** मिथ्यादर्शनाने मोहित जीव **(परु अप्पा ण मुणेइ)** पर तथा निजात्म्याला जाणत नाही **(सो बहिरप्पा)** तो बहिरात्मा आहे **(पुण संसारु भमेइ)** तो वारंवार संसारात भ्रमण करतो **(जिणभणिउ)** असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** मिथ्यादर्शनाने मोहित झाल्यामुळे जो जीव स्व-पर पदार्थांना जाणत नाही, तो बहिरात्मा आहे आणि बहिरात्मा जीव संसारामध्ये वारंवार भ्रमण करतो ; असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे.

**अंतरात्म्याचे स्वरूप-**

**जो परियाणइ अप्प परु, जो परभाव चएइ।**
**सो पंडिउ अप्पा मुणहिं, सो संसार मुएइ ।।८।।**

स्व-पर ज्ञान ज्याला होते, पर त्यागुनि ध्यान धरी।
तो पंडित अंतर आत्मा, संसाराचा नाश करी ।।८।।

**अन्वयार्थ : (जो अप्प परु परियाणइ)** जो स्व आणि परद्रव्याला यथार्थ रीतीने जाणतो; **(जो परभाव चएइ)** तसेच जो आपल्या आत्म-स्वभावाला सोडून अन्य सर्व परभावांचा त्याग करतो **(सो पंडिउ अप्पा मुणहिं)** तोच भेदविज्ञानी/अंतरात्मा होय. तसेच तो आत्मानुभव करतो **(सो संसार मुएइ)** आणि संसारातून मुक्त होतो.

**सामान्यार्थ :** जो स्व आणि पर द्रव्याला यथार्थ रीतीने जाणतो; तसेच जो आपल्या आत्मस्वभावाला सोडून अन्य सर्व परभावांचा त्याग करतो, तोच पंडित/भेदविज्ञानी अर्थात अंतरात्मा संसारातून मुक्त होतो.

**परमात्म्याचे स्वरूप-**

**णिम्मलु णिक्कलु सुद्ध जिणु, विण्हु बुद्धु सिव संतु।**
**सो परमप्पा जिणभणिउ, एहउ जाणि णिभंतु ।।९।।**

सिद्ध बुद्ध हरिहर विष्णु, निर्मल निष्कल श्री जिन जो।
नि:संशय तो परमात्मा, वीतराग सर्वज्ञचि जो ।।९।।

**अन्वयार्थ : (णिम्मलु)** जो निर्मळ **(णिक्कलु)** निष्कल अर्थात शरीररहित **(सुद्ध)** शुद्ध **(जिणु)** जिन **(विण्हु)** विष्णु **(बुद्धु)** बुद्ध **(सिव)** शिव **(संत)** परमशांत आहे **(सो परमप्पा)** तोच परमात्मा आहे **(जिणभणिउ)** असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे **(एहउ णिभंतु जाणि)** असे तुम्ही नि:शंक होऊन जाणा.

**सामान्यार्थ :** जो निर्मळ, निष्कल अर्थात शरीररहित, शुद्ध, जिन, विष्णु, बुद्ध, शिव, आणि परमशांत आहे तोच परमात्मा आहे; असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे – असे तुम्ही नि:शंक होऊन जाणा.

**भावार्थ :** या पद्यामध्ये आचार्य श्री योगींदुदेवांनी परमात्म्याचा उल्लेख भिन्न-भिन्न विवक्षेने अनेक नावांनी केलेला आहे. आपण प्रत्येकाची अपेक्षा पाहू या –

**निर्मळ :** ज्ञानावरणादि आठ द्रव्यकर्म आणि मोह-राग-द्वेष रूप भावकर्म मळाने रहित असल्यामुळे ते परमात्मा निर्मळ आहेत, पवित्र आहेत.

**निष्कल :** कल अर्थात शरीर, ते परमात्मा शरीररहित असल्यामुळे निष्कल आहेत, ज्ञानशरीरी आहेत.

**शुद्ध :** प्रत्येक आत्मा स्वभावाने शुद्धच असतो. येथे परमात्मा द्रव्य स्वभावाच्या दृष्टीने शुद्ध तर आहेतच; परंतु पर्यायगत शुद्धता देखील त्यांना प्रगट झाल्याचे स्पष्ट केले आहे.

**जिन :** क्रोधादि कषायशत्रूंना जिंकल्यामुळे परमात्मा जिन आहेत.

**विष्णु :** परमात्मा, ज्ञानाद्वारे लोकालोकात व्यापक झाले आहेत, म्हणजेच ते सर्वांना जाणतात म्हणून विष्णु आहेत.

**बुद्ध :** स्व व पर तत्त्वाला स्पष्टरूपाने जाणतात, म्हणून ते बुद्ध आहेत.

**शिव :** शिव म्हणजे कल्याण, परमात्मा स्वत: कल्याणस्वरूप अर्थात सुखस्वरूप आहेत व इतर भव्य जीवांना देखील कल्याणकारक आहेत.

**शांत :** परम शांत अर्थात जन्म-मरणादी अठरा दोषांनी रहित झाल्यामुळे वीतरागी आहेत.

**यावरून हे लक्षात येते की जिनधर्मात व्यक्तीची मुख्यता नसून त्यांच्या गुणांची मुख्यता आहे.**

**बहिरात्मा, परद्रव्याला आपले मानतो -**

**देहादिउ जे पर कहिय, ते अप्पाणु मुणेइ ।**
**सो बहिरप्पा जिण-भणिउ, पुणु संसारु भमेइ ।।१०।।**

देहादिक जे पर आहे, त्यांना जो निज समजतसे ।
तो बहिरात्मा संसारी, फिरतो हे जिन वचन असे ।।१०।।

**अन्वयार्थ : (देहादिउ जे पर कहिया)** शरीर इत्यादी परद्रव्य, ज्यांना आत्म्याहून भिन्न सांगितले गेले आहे **(ते अप्पाणु मुणेइ)** त्या द्रव्यरूपच जो स्वतःला मानतो **(सो बहिरप्पा)** तो बहिरात्मा **(जिनभणिउ)** असे जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे **(पुणु संसारु भमेइ)** तो बहिरात्मा संसारात वारंवार भ्रमण करतो.

**सामान्यार्थ :** शरीरादी परद्रव्य ज्यांना आत्म्याहून भिन्न आहे - असे सांगितले आहे; त्या परद्रव्यस्वरूपच जो स्वतःला मानतो, तो बहिरात्मा आहे असे जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे आणि असा बहिरात्मा जीव संसारात वारंवार भ्रमण करतो.

**भावार्थ :** निजात्म तत्त्वाला न जाणता अन्य/पर द्रव्याच्या ठिकाणी आपलेपण मानणे हेच मिथ्यात्वस्वरूपी महान पाप आहे. हे पाप सात व्यसनांपेक्षाही अनर्थकारी जाणून त्याचा प्रथम त्याग करावयास हवा.

**ज्ञानी, परद्रव्याला आपले मानत नाही -**

**देहादिउ जे पर कहिय, ते अप्पाणु ण होहि ।**
**इउ जाणेविणु जीव तुहुं, अप्पा अप्प मुणेहि ।।११।।**

देहादिक जड पर ते असती, ते आत्म्याचे कधी न बरे।
जाणुनिया चिर रहस्य हे, निज आत्म्याला जाण खरे।।११।।

**अन्वयार्थ : (देहादिउ जे पर कहिय)** शरीरादी परद्रव्य ज्यांना आत्म्याहून भिन्न सांगितले आहे. **(ते अप्पाणु ण होहि)** ती द्रव्ये, आत्मा होऊ शकत नाहीत **(इउ जाणेविणु)** हे जाणून **(जीव)** हे जीवांनो ! **(तुहुँ अप्पा अप्प मुणेहि)** तुम्ही आत्म्याला आत्मा जाणा.

**सामान्यार्थ :** शरीरादी परद्रव्य ज्यांना आत्म्याहून भिन्न आहेत असे सांगितले आहे ती द्रव्ये, आत्मा होऊ शकत नाहीत. हे जाणून हे जीवांनो ! स्वतःच्या आत्म्यालाच आत्मा जाणा/निजात्मानुभव करा.

**आत्मज्ञानीच निर्वाणाची प्राप्ती करतो –**

**अप्पा अप्पउ जइ मुणहि, तउ णिव्वाणु लहेहि।**
**पर अप्पा जइ मुणहि, तहु तुहुँ संसार भमेहि ।।१२।।**

जो नित आत्म्याला आत्मा, जाणी तो मोक्षा जातो।
जो परवस्तु निज मानी, तो नित संसारी फिरतो ।।१२।।

**अन्वयार्थ : (जइ)** जर तुम्ही **(अप्पा अप्पउ मुणहि)** आत्म्यालाच आत्मा मानाल **(तउ णिव्वाणु लहेहि )** तर निर्वाणाची प्राप्ती होईल **(जइ)** जर **(पर अप्पा मुणहि)** परपदार्थांना आत्मा मानाल **(तहु तुहुँ संसार भमेहि)** तर तुम्ही संसारामध्येच परिभ्रमण कराल.

**सामान्यार्थ :** जर तुम्ही आत्म्यालाच आत्मा मानाल तर तुम्हाला निर्वाणाची प्राप्ती होईल. जर परपदार्थांना आत्मा मानाल तर तुम्ही संसारामध्येच भ्रमण कराल.

**इच्छारहित तपच निर्वाणाला कारण –**

**इच्छा–रहिउ तव करहि, अप्पा अप्पु मुणेहि।**
**तउ लहु पावइ परम गइ, पुण संसारु ण एहि ।।१३।।**

इच्छाविना तप आत्मरती, मोक्षाचे कारण आहे।
संसाराच्या नाशाचा, एकमेव हा पथ आहे ।।१३।।

**अन्वयार्थ : (अप्पा)** भो आत्मन् ! **(इच्छा–रहिउ तव करहि)** जर तुम्ही इच्छारहित होऊन तप कराल **(अप्प मुणेहि)** व आत्म्याचा

अनुभव कराल **(तउ लहु परमगइ पावइ )** तर शीघ्रच परमगतीला प्राप्त व्हाल **(पुण संसारु ण एहि)** आणि तुम्ही पुन्हा कधीही या संसारामध्ये येणार नाही.

**सामान्यार्थ :** हे आत्म्यांनो ! जर तुम्ही इच्छारहित होऊन तप कराल व आत्म्याचा अनुभव कराल तर शीघ्रच परमगतीला प्राप्त व्हाल व पुन्हा कधीही या संसारामध्ये येणार नाही.

**परिणामानेच बंध आणि मोक्ष –**

**परिणामे बंधु जि कहिउ, मोक्ख वि तह जि वियाणि।**
**इउ जाणेविणु जीव तुहुँ, तह भावहु परियाणि।।१४।।**

आत्म्याचे परिणाम सदा, बंध मोक्ष कारण आहे।
हेच भाव तु जाणुनि घे, दुसरे ना कारण आहे।।१४।।

**अन्वयार्थ : (परिणामे बंधु जि कहिउ)** परिणामानेच कर्माचा बंध सांगितला आहे **(तह जि मोक्ख वि वियाणि)** त्याचप्रकारे परिणामानेच मोक्षाची प्राप्ती जाणा. **(जीव)** हे जीवांनो ! **(इउ जाणेविणु)** असे समजून **(तुहुँ तह भावहु परियाणि)** तुम्ही त्या परिणामांना ओळखा.

**सामान्यार्थ :** परिणामानेच कर्मांचा बंध सांगितला आहे. तसेच परिणामानेच मोक्षाची प्राप्तीही होते; असे समजून हे जीवांनो ! तुम्ही त्या परिणामांना ओळखा.

**पुण्यकर्म मोक्षसुखदाता नाही –**

**अह पुणु अप्पा ण वि मुणहि, पुण्णु जि करइ असेसु।**
**तउ वि ण पावइ सिद्धसुहु, पुणु संसारु भमेसु।।१५।।**

आत्मज्ञान विन पुण्याचे, कार्य करी जो संसारी।
तो शिव सुख ना प्राप्त करी, फिरे निरंतर संसारी।।१५।।

**अन्वयार्थ : (अह पुणु अप्पा ण जि मुणहि)** जर तुम्ही आत्म्याला जाणले नाही **(असेसु पुण्णु वि करइ)** आणि पुण्यच

पुण्य करत राहीलात **(तउ वि सिद्धसुह ण पावइ)** तर तुम्ही सिद्धांचे/मुक्तीचे सुख प्राप्त करू शकणार नाही **(पुणु संसारु भमेसु)** वारंवार संसारातच भ्रमण करत रहाल.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! जर तुम्ही आत्म्याला न जाणता सर्व प्रकारचे पुण्यच पुण्य करत राहिलात तर तुम्हाला मुक्तीचे सुख मिळू शकणार नाही. उलट वारंवार तुम्ही संसारातच भ्रमण करत रहाल.

**भावार्थ :** मोक्षसुखासाठी एकमात्र आत्मज्ञानच साधन आहे, अन्य कोणतेही साधन वा उपाय नाही.

**आत्म-दर्शनच मोक्षाचे साधन –**

**अप्पा-दंसणु इक्कु परु, अण्णु ण किं पि वियाणि।**
**मोक्खहँ कारण जोईया, णिच्छइँ एहउ जाणि ।।१६।।**

केवळ आत्म्याचे दर्शन, मोक्षाचे कारण आहे।
हे योगी ! तू जाणुनि घे, दुसरा शिवपथ ना आहे ।।१६।।

**अन्वयार्थ : (जोईया)** हे योगी ! **(इक्कु अप्पा दंसणु मोक्खइँ कारण)** एक आत्म-दर्शनच मोक्षाचे कारण आहे. **(अण्णु परु ण किं पि वियाणि)** अन्य कोणतेही मोक्षाचे कारण नाही, असे जाणा **(णिच्छइँ एहउ जाणि)** व ज्ञानपूर्वक असाच निर्णय/निश्चय करा.

**सामान्यार्थ :** हे योगी ! एक आत्म-दर्शनच मोक्षाचे कारण आहे, अन्य कोणतेही मोक्षाचे कारण नाही; असे जाणा अर्थात ज्ञानपूर्वक असाच निर्णय/निश्चय करा.

**भावार्थ :** मागील गाथा क्रमांक १५ मध्ये आत्मज्ञानाला मोक्षाचे कारण सांगितले आणि या गाथेमध्ये आत्मदर्शनाला मोक्षाचे कारण सांगितले. या दोन्ही गाथांमध्ये परस्पर विरोध समजू नये; कारण ज्ञान व दर्शन यांच्यामध्ये परस्पर अविनाभाव संबंध आहे.

## मार्गणा व गुणस्थान आत्मा नाहीत –

**मग्गण–गुणठाणइ कहिय, विवहारेण वि दिट्ठी।**
**णिच्छयणइँ अप्पा मुणहु, जिम पावहु परमेट्ठि।।१७।।**

गुणस्थान मार्गणा कथन हा, व्यवहारचि आत्म्याला जाणुनि घे।
परमेष्ठीपद लाभाया, निज आत्म्याला जाणुनि घे।।१७।।

**अन्वयार्थ : (विवहारेण वि दिट्ठी)** व्यवहारनयाच्या दृष्टीनेच **(मग्गण–गुणठाणइ)** जीवाला मार्गणास्थान व गुणस्थान सांगितले आहेत **(णिच्छयणइँ)** निश्चयनयाच्या दृष्टीने **(अप्पा मुणहु)** तुम्ही स्वत:ला आत्माच माना की **(जिम परमेट्ठि पावहु)** त्यामुळे तुम्ही सिद्धपदाला प्राप्त व्हाल.

**सामान्यार्थ :** व्यवहारनयाच्या दृष्टीनेच जीवाला मार्गणास्थान व गुणस्थान आहेत, असे सांगितले आहे. निश्चयनयाच्या दृष्टीने तुम्ही स्वत:ला आत्माच माना की ज्यामुळे तुम्ही सिद्धपदाला प्राप्त व्हाल.

**भावार्थ :** ज्या विशिष्ट पर्याय/अवस्थेच्या आधारे जीवांना जाणता येते त्यांना मार्गणास्थान म्हणतात. मार्गणेचे पुढीलप्रमाणे १४ भेद आहेत – गती, इंद्रिय, काय, योग, वेद, कषाय, ज्ञान, संयम, दर्शन, लेश्या, भव्यत्व, सम्यक्त्व, संज्ञी आणि आहार.

मोह आणि योगाच्या निमित्ताने जीवाच्या श्रद्धा व चारित्र गुणांची होणारी तारतम्यरूप अवस्था म्हणजेच गुणस्थान आहे. गुणस्थानाचे पुढीलप्रमाणे १४ भेद आहेत – मिथ्यात्व, सासादन सम्यक्त्व, मिश्र (सम्यग्मिथ्यात्व), अविरत सम्यक्त्व, देशविरत, प्रमत्तविरत, अप्रमत्तविरत, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण, सूक्ष्मसांपराय, उपशांतमोह, क्षीणमोह, सयोगकेवली व अयोगकेवली.

प्रत्येक आत्मा वास्तविक पाहता मार्गणास्थान व गुणस्थानरहित अनादीअनंत शुद्धस्वभावी आहे.

**गृहस्थ देखील मोक्षमार्गी –**

**गिहि–वावर परिट्ठिया, हेयाहेउ मुणंति।**
**अणुदिणु झायहि देउ जिणु, लहु णिव्वाणु लहंति।।१८।।**

गृहस्थ हेयोपादेया, जाणुनि स्वभावात रमती।
ध्यान धरूनि जिनदेवाचे, निर्वाणाला नित जाती।।१८।।

**अन्वयार्थ : (गिहिवावर परिट्ठिया)** जे गृहस्थ व्यापार–धंद्यामध्ये संलग्न आहेत **(हेयाहेउ मुणंति)** तसेच हेयोपादेय (त्याज्य व ग्राह्य) तत्त्वांना यथार्थ जाणतात **(अणुदिणु जिणु देउ झायहि)** आणि निरंतर जिनेंद्र देवांचे ध्यान करतात **(लहु णिव्वाणु लहंति)** ते गृहस्थ देखील शीघ्र निर्वाणाची प्राप्ती करतात.

**सामान्यार्थ :** जे गृहस्थ व्यापार–धंद्यामध्ये संलग्न आहेत. हेयोपादेय (त्याज्य व ग्राह्य) तत्त्वांना यथार्थ जाणतात आणि निरंतर जिनेंद्र देवांचे ध्यान करतात, ते गृहस्थ असूनही (दिगंबर साधू अवस्था स्वीकारल्यानंतर) शीघ्र मोक्ष पदाची प्राप्ती करतात.

**जिनेंद्रांचे स्मरण मोक्षाचे कारण –**

**जिणु सुमिरहु जिणु चिंतहु, जिणु झायहु सुमणेण।**
**सो झायंतहँ परम–पउ, लब्भइ एक्क–खणेण।।१९।।**

जिनेश्वराच्या स्मरणाने, चिंतन अन् नित ध्यानाने।
परमात्म्याचे पद मिळते, परमशुद्ध परिणामाने।।१९।।

**अन्वयार्थ : (सुमणेण)** शुद्ध भावनेने **(जिणु सुमिरहु)** जिनेंद्र देवांचे स्मरण करा **(जिणु चिंतहु)** जिनेंद्र भगवंतांचे चिंतवन करा **(जिणु झायहु)** जिनेंद्राचे ध्यान करा **(सो झायंतह)** या प्रमाणे ध्यान केल्यामुळे **(एक्कख–खणेण)** एका क्षणामध्ये **(परम–पउ लब्भइ)** परम पदाची/मोक्ष पदाची प्राप्ती होते.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! शुद्ध भावनेने जिनेंद्र देवांचे स्मरण करा. जिनेंद्र भगवंतांचे चिंतवन करा आणि जिनेंद्र प्रभूंचे ध्यान करा.

या प्रमाणे जिनेंद्रांचे ध्यान केल्याने परम पदाची/मोक्ष पदाची प्राप्ती होते.

**निज शुद्धात्मा व जिनेंद्र देवामध्ये अंतर नाही –**

**सुद्धप्पा अरु जिणवरहँ, भेउ म किमपि वियाणि।**
**मोक्खहँ कारण जोइया, णिच्छइँ एउ वियाणि।।२०।।**

शुद्धात्मा अन् परमात्मा, भेद न किंचित दोघात।
शिव साधन हे योगी ! तू, जाण सदा निज चित्तात।।२०।।

**अन्वयार्थ : (जोइया)** हे योगी ! **(सुद्धप्पा अरु जिणवरहँ किमपि भेउ म वियाणि)** आपला निज शुद्धात्मा आणि जिनेंद्र देवामध्ये कोणत्याही प्रकाराचे अंतर समजू नका **(णिच्छइ एउ मोक्खह कारण वियाणि)** निश्चयनयाने हेच मोक्षाचे कारण जाणा.

**सामान्यार्थ :** हे योगी ! आपला निज शुद्धात्मा व जिनेंद्र देवामध्ये कोणत्याही प्रकारचे अंतर समजू नका. अशी यथार्थ श्रद्धाच निश्चयाने मोक्षाचे कारण जाणा.

**आपला आत्माच जिन आहे, हाच सिद्धांताचा सार आहे –**

**जो जिणु सो अप्पा मुणहु, इहु सिद्धन्तहँ सारु।**
**इह जाणीविणु जोइयहो, छंडहु मायाचारु।।२१।।**

जो जिन तो आत्मा आहे, हा सिद्धांताचा सार।
हे योगीजन ! मनन करा, अन् सोडा मायाचार।।२१।।

**अन्वयार्थ : (जो जिणु सो अप्पा मुणहु)** जो जिनेंद्र भगवान आहे, तोच हा मी आत्मा आहे, असे तुम्ही मनन करा **(इह सिद्धन्तहु सारु)** हाच सिद्धांताचा सार आहे **(इह जाणीविण)** असे जाणून **(जोयइहु)** हे योगी-जनांनो ! **(मायाचारु छंडहु)** मायाचार सोडा.

**सामान्यार्थ :** जे जिनेंद्र भगवान आहेत, तोच हा मी आत्मा आहे, असे तुम्ही मनन करा; हाच सिद्धान्ताचा सार आहे, असे जाणून हे योगीजनो ! मायाचार सोडा.

**मीच परमात्मा आहे –**

**जो परमप्पा सो जि हउँ, जो हउँ सो परमप्पु।**
**इउ जाणेविणु जोइया, अण्णु म करहु वियप्पु।।२२।।**

जो परमात्मा तो तर मी, जो मी तो तर परमात्मा।
विकल्प सोडून जाण सदा, आत्मा एकच परमात्मा।।२२।।

**अन्वयार्थ : (जोइया)** हे योगी ! **(जो परमप्पा सो जि हउँ)** जो परमात्मा आहे तोच मी आहे **(जो हउँ सो परमप्पा)** तसेच जो मी आहे तोच परमात्मा आहे **(इउ जाणेविणु)** असे जाणून **(अण्णु वियप्पु म करहु)** इतर कोणताही विकल्प करू नका.

**सामान्यार्थ :** हे योगी ! जो परमात्मा आहे, तोच मी आहे. तसेच जो मी आहे, तोच परमात्मा आहे; असे जाणून इतर कोणताही विकल्प करू नका.

**आत्मा लोकप्रमाण आहे –**

**सुद्ध-पएसहँ पूरियउ, लोयायास-पमाणु।**
**सो अप्पा अणुदिणु मुणहु, पावहु लहु णिव्वाणु।।२३।।**

शुद्ध असंख्य प्रदेशी तो, आत्मा लोकप्रमाण असे।
जो त्याचे नित मनन करी, तो मोक्षाला जात असे।।२३।।

**अन्वयार्थ : (लोयायास-पमाणु सुद्ध-पएसहँ पूरियउ)** लोकाकाश प्रमाण असंख्यात शुद्ध प्रदेशांनी जो पूर्ण आहे **(सो अप्पा)** तोच मी स्वत: आत्मा आहे **(अणुदिणु मुणहु)** असे रात्रं-दिवस/सतत मनन करा **(णिव्वाणु लहु पावहु)** आणि शीघ्र निर्वाणाची प्राप्ती करा.

**सामान्यार्थ :** लोकाकाशप्रमाण असंख्यात शुद्ध प्रदेशांनी जो पूर्ण आहे, तोच हा मी स्वत: आत्मा आहे; असे रात्रं-दिवस/सतत मनन करा आणि शीघ्र निर्वाणाची प्राप्ती करा.

**आत्मा शरीर-प्रमाण –**

**णिच्छइँ लोय – पमाणु मुणि, ववहारे सुसरीरु।**
**एहउ अप्प-सहाउ मुणि, लहु पावहि भव तीरु।।२४।।**

लोकप्रमाण असे आत्मा, देह प्रमाणचि व्यवहार।
असाच अनुभव जो करितो, होत असे तो भवपार।।२४।।

**अन्वयार्थ : (णिच्छइँ लोयपमाणु मुणि)** निश्चयनयाने, वास्तविक पाहता प्रत्येक आत्मा लोकाकाश-प्रमाण असंख्यातप्रदेशी आहे – असे माना **(ववहारे सुसरीरु मुणि)** आणि व्यवहारनयाने शरीर-प्रमाण आहे – असे समजा **(एहउ अप्प-सहाउ मुणि)** अशाप्रकारे आपल्या आत्मस्वभावाचे श्रद्धान करून **(भव-तीरु लहु पावहि)** जीव लवकरच संसार सागराच्या किनाऱ्याला पोहोचतो/ मुक्त होतो.

**सामान्यार्थ :** निश्चयनयाने/वास्तविक पाहता प्रत्येक आत्मा लोकाकाश-प्रमाण असंख्यात प्रदेशी आहे असे माना आणि व्यवहारनयाने शरीर-प्रमाण आहे असे समजा. अशाप्रकारे आपल्या आत्मस्वभावाचे श्रद्धान करून जीव लवकरच संसार सागराच्या किनाऱ्याला पोहोचतो/मुक्त होतो.

**सम्यक्त्वाशिवाय संसारामध्ये भ्रमण –**

**चउरासी-लक्खहिं फिरिउ, कालु अणाइ अणंतु।**
**पर सम्मत्तु ण लद्धु जिय, एहहु जाणि णिभंतु।।२५।।**

काळ अनादि अनंत सदा, लाख चौऱ्यांशी योनीत।
सम्यक्त्वाविण जीव फिरे, जाण नसे संशय यात।।२५।।

**अन्वयार्थ : (अणाइ कालु)** अनादी काळापासून **(चउरासी लक्खहि फिरिउ)** अज्ञानी जीव चौऱ्यांशी लक्ष योनींमध्ये फिरत राहिलेला आहे **(अणंतु)** आणि सम्यक्त्वाशिवाय अनंत काळापर्यंत पुन्हा भ्रमण करू शकतो; **(पर सम्मत्तु ण लद्धु)** परंतु अजूनही सम्यक्त्व

प्राप्त केले नाही **(जिय)** हे जीवांनो ! **(णिभंतु एहउ जाणि)** भ्रान्तिरहित होऊन ही सत्यस्थिती तुम्ही जाणा.

**सामान्यार्थ :** अनादी काळापासून अज्ञानी जीव चौऱ्यांशी लाख योनींमध्ये फिरत राहिलेला आहे आणि सम्यक्त्व प्राप्त न केल्यामुळे अनंत काळापर्यंत पुन्हा भ्रमण करू शकतो; तरीही त्याने सम्यक्त्व प्राप्त केले नाही. म्हणून हे जीवांनो ! भ्रांतिरहित होऊन ही सत्यस्थिती जाणा.

**शुद्धात्म्याचे मननच मोक्षमार्ग –**

**सुद्धु सचेयणु बुद्धु जिणु, केवल–णाण सहाउ।**
**सो अप्पा अणुदिणु मुणहु, जइ चाहहु सिव–लाहु।।२६।।**

शुद्ध बुद्ध केवलज्ञानी, चेतन जिन आत्मा आहे।
त्याचा अनुभव घे जीवा, जर शिव अभिलाषा आहे।।२६।।

**अन्वयार्थ : (जइ सिवलाहु चाहउ)** जर मोक्षप्राप्तीची इच्छा असेल तर **(सुद्धु)** शुद्ध/वीतराग/कर्ममलरहित **(सचेयणु)** चेतनागुणधारी **(बुद्धु)** स्वयंबुद्ध **(जिणु)** विकार विजयी/ कर्मशत्रुंना जिंकणाऱ्या **(केवलणाण सहाउ)** केवलज्ञान/ पूर्ण ज्ञानस्वभावी **(सो अप्पा)** अशा निजात्म्याचे **(अणुदिणु)** सदैव/रात्रं-दिवस **(मुणहु)** मनन करा.

**सामान्यार्थ :** जर मोक्षप्राप्तीची इच्छा असेल तर शुद्ध/वीतराग, कर्ममलरहित, चेतनागुणधारी, स्वयंबुद्ध, विकार विजयी/ कर्मशत्रुंना जिंकणाऱ्या व केवलज्ञान/पूर्ण ज्ञानस्वभावी अशा निजात्म्याचे सदैव/ रात्रं-दिवस मनन करा.

**निर्मल आत्म्याची भावनाच मोक्षदात्री –**

**जाव ण भावहि जीव तुहुँ, णिम्मल अप्प–सहाउ।**
**ताव ण लब्भइ सिव–गमणु, जहिं भावहु तहिं जाउ।।२७।।**

शुद्धात्म्याची अनुभूती, जोवर जीवा होत नसे।
तोवर जीवा मोक्ष नसे, तो नित भव भव फिरत असे।।२७।।

**अन्वयार्थ : (जीव)** हे जीवांनो ! **(जाम तुहुँ णिम्मल अप्प-सहाउ ण भावहि)** जोपर्यंत तुम्ही निर्मल आत्मस्वभावाची भावना करणार नाही **(ताव सिव गमणु ण लब्भइ)** तोपर्यंत तुम्हाला मोक्षपद मिळणार नाही. **(जहिं भावहु तहिं जाउ)** स्वैरपणे हवे तिकडे भटकत रहा.

**सामान्यार्थ :** स्वैरपणे हवे तिकडे तुम्ही भटकत रहा, तथापि हे जीवांनो ! जोपर्यंत निर्मल आत्मस्वभावाची भावना करणार नाहीत, तोपर्यंत तुम्हाला मोक्षपद मिळणार नाही; हे नक्की समजा.

**आपला आत्माच त्रिलोकपूज्य जिनेंद्र –**

**जो तइलोयहँ झेउ जिणु, सो अप्पा णिरु वुत्तु।**
**णिच्छय णइँ एमइ भणिउ, एहउ जाणि णिभंतु ।।२८।।**

ध्यान योग्य जो जिन जगती, तो एकच आत्मा जाण।
निश्चय नय हे सांगतसे, निःसंशय तू हे जाण ।।२८।।

**अन्वयार्थ : (णिच्छय णइँ एमइ भणिउ)** निश्चयनयाने असे सांगितलेले आहे की **(जो तइलोयहँ झेउ जिणु)** जो तीन लोकातील जीवांकडून ध्यान करण्यायोग्य जिनेंद्र आहे **(सो अप्पा णिरु वुत्तु)** तो वास्तविक आत्माच आहे. **(एहउ णिभंतु जाणि)** असे तुम्ही भ्रांतीरहित होऊन जाणा !

**सामान्यार्थ :** निश्चयनयाने असे सांगितले आहे की ''जो तीन लोकातील जीवांकडून ध्यान करण्यायोग्य जिनेंद्र आहे, तो वास्तविक निज आत्माच आहे.'' – असे तुम्ही भ्रांतीरहित होऊन जाणा !

**मिथ्यादृष्टीचे व्रत, तपादी मोक्षमार्ग नाहीत –**

**वय-तव-संजम-मूलगुण, मूढहँ मोक्ख णि वुत्तु।**
**जाव ण जाणइ इक्क पर, सुद्धउ भाउ पवित्तु ।।२९।।**

जोवर निर्मल भाव नसे, तोवर निज कल्याण नसे।
मिथ्यादृष्टी जीवांचे, व्रत-तप-संयम व्यर्थ असे ।।२९।।

**अन्वयार्थ : (जाव इक्क पर सुद्धउ पवित्तु भाउ ण जाणइ)** जोपर्यंत एक, परमशुद्ध, पवित्र अशा भावाचा अनुभव होत नाही **(मूढह वय–तव–संजम मूलगुण मोक्ख णिवुत्तु)** तोपर्यंत मूढ(मिथ्यादृष्टी–अज्ञानी) जीवाने केलेल्या व्रत, तप, संयम मूलगुणांच्या पालनाला मोक्षाचा उपाय/साधन म्हणता येत नाही.

**सामान्यार्थ :** जोपर्यंत एक, परम, शुद्ध, पवित्र अशा आत्म–स्वभावाचा अनुभव होत नाही, तोपर्यंत मूढ (मिथ्यादृष्टी–अज्ञानी) जीवाने केलेले व्रत, तप, संयम व मूलगुणांचे पालन यांना मोक्षाचा उपाय वा साधन म्हणता येत नाही. अथवा हे सर्व काही व्यर्थच आहे.

**व्रतींना निर्मल आत्म्याचा अनुभव करणे योग्य –**

**जो णिम्मल अप्पा मुणइ, वय संजमु संजुत्तु।**
**तो लहु पावइ सिद्धि सुहु, इउ जिणणाणह वुत्तु।।३०।।**

व्रत तप संयम सहितचि जो, शुद्धात्म्याचा अनुभव घेतो।
हे निश्चय जिन वचन असे, तो निश्चित मोक्षा जातो।।३०।।

**अन्वयार्थ : (जो वय–संजम–संजुत्तु णिम्मल अप्पा मुणइ)** जो व्रत, संयमाने युक्त होऊन निर्मल आत्म्याचा अनुभव करेल **(तो सिद्धि सुह लहु पावइ)** तो सिद्ध/मुक्ती सुखाची प्राप्ती लवकरच करेल **( इउ जिणणाणहँ वुत्तु)** असे जिनेंद्र भगवंतांचे कथन आहे.

**सामान्यार्थ :** जो व्रत, संयमानी युक्त होऊन निज निर्मल आत्म्याचा अनुभव करेल तो निश्चितच सिद्ध/मुक्ती सुखाची प्राप्ती लवकरच करेल; असे जिनेंद्र भगवंतांचे कथन आहे.

**केवळ व्यवहार चारित्र व्यर्थ –**

**वउ–तउ–संजमु–सीलु जिय, ए सव्वइँ अकयत्थु।**
**जाव ण जाणइ इक्क परु, सुद्धउ भाउ पवित्तु।।३१।।**

जोवर निर्मल आत्म्याचा, अनुभव जीवा होत नसे।
तोवर व्रत तप संयम हे, निष्फळ सारे होत असे।।३१।।

**अन्वयार्थ : (जिय)** अरे जीवांनो ! **(जाव इक्क परु सुद्धउ पवित्तु भाउ ण जाणइ)** जोपर्यंत एक, उत्कृष्ट, शुद्ध, वीतराग स्वभावाचा अनुभव करणार नाहीत **(तउ संजमु सील ए सव्वइँ अकयत्थु)** तोपर्यंत तप, संयम, शील हे सर्व अकृतार्थ/व्यर्थ/निष्फळ आहेत.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! जोपर्यंत एक, उत्कृष्ट, शुद्ध वीतराग स्वभावाचा अनुभव करणार नाहीत; तोपर्यंत तप, संयम, शील हे सर्व अकृतार्थ/व्यर्थ/निष्फळ आहेत.

**पुण्य-पाप दोन्ही संसार –**

**पुण्णिं पावइ सग्ग जिउ, पावइ णरयणिवासु।**
**बे छंडिवि अप्पा मुणइ, तउ लब्भइ सिववासु।।३२।।**

पुण्य नेतसे स्वर्गाला, पाप नेतसे नरकाला।
पण जो निज आत्म्यात रमे, तो जाई शिवसदनाला।।३२।।

**अन्वयार्थ : (जिउ पुण्णिं सग्ग पावइ)** हा जीव पुण्य करून स्वर्गाला प्राप्त करतो **(पावइ णरय णिवासु)** आणि पापामुळे नरकास जातो. **(बे छंडिवि अप्पा मुणइ)** दोन्ही अर्थात पुण्य-पापांना सोडून जो आत्म्याचे मनन-चिंतन/ध्यान करेल **(तउ सिव-वासु लब्भइ)** त्यास शिववास अर्थात मोक्षपद मिळेल.

**सामान्यार्थ :** हा जीव पुण्य करून स्वर्ग प्राप्त करतो आणि पापामुळे नरकास जातो. दोन्ही अर्थात पुण्य-पापांना सोडून जो आत्म्याचे मनन-चिंतन/ध्यान करेल त्यास शिववास अर्थात मोक्षपद मिळेल.

**निश्चय चारित्रच मोक्षाचे कारण –**

**वय-तउ-संजमु-सीलु-जिय, इय सव्वइ ववहारु।**
**मोक्खह कारणु एक्कु मुणि, तो तइ लोयहु सारु।।३३।।**

व्रत तप संयम शील जगी, हाच सर्व शुभ व्यवहार।
शिवकारण निश्चय आत्मा, एक असे त्रिभुवन सार।।३३।।

**अन्वयार्थ : (जिय)** हे जीवांनो ! **(वय-तउ-संजमु-सीलु इय सव्वइ ववहारु)** व्रत, तप, संयम, शील हे सर्व व्यवहार चारित्र आहे. **(मोक्खह कारणु एक्कु मुणि)** मोक्षाचे कारण एक निश्चय चारित्रच आहे; असे श्रद्धान करा **(तो तइ लोयहु सारु)** कारण हे निश्चय चारित्रच तीन लोकातील सारभूत वस्तु आहे.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! व्रत, तप, संयम, शील हे सर्व व्यवहार चारित्र आहे. मोक्षाचे कारण एक निश्चय चारित्रच आहे; असे श्रद्धान करा की हे निश्चय चारित्रच तीन लोकातील सारभूत वस्तु आहे.

**निजात्म्याचे ध्यान करा –**

**अप्पा अप्पइँ जो मुणइ, जो परभाउ चएइ।**
**सो पावइ सिवपुरि-गमणु, जिणवरु एउ भणेइ।।३४।।**

सोडुनिया परभावाला, जो निज स्वभावात रमतो।
हे श्री जिनवर कथन असे, मोक्ष महाली तो जातो।।३४।।

**अन्वयार्थ : (जो परभाउ चएइ)** जो परभावांचा त्याग करतो **(जो अप्पा अप्पइँ मुणइ)** आणि जो स्वत: आपल्या आत्म्याद्वारे आत्म्याचा अनुभव करतो **(सो सिवपुरि-गमणु पावइ)** तो मोक्षरूपी नगरीमध्ये पोहोचतो **(एउ जिणवरु भणेइ)** असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** जो जीव परभावांचा त्याग करतो आणि जो स्वत: आपल्या आत्म्याद्वारे आत्म्याचा अनुभव करतो, तो मोक्षरूपी नगरीमध्ये पोहोचतो; असे जिनेंद्र भगवंतांनी सांगितले आहे.

**सहा द्रव्यादिकांचे ज्ञान आवश्यक –**

**छह दव्वइँ जे जिण कहिया, णव पयत्थ जे तत्त।**
**विवहारे जिण-उत्तिया, ते जाणियहि पयत्त।।३५।।**

सप्त तत्त्व नऊ पदार्थ अन्, षट् द्रव्यांचा हा लोक।
व्यवहाराने जाण तया, हे जिन वचन असे एक।।३५।।

**अन्वयार्थ : (जिण जे छह दव्वइँ णव पयत्थ जे तत्त कहिया)** जिनेंद्र भगवंतांनी जी सहा द्रव्यं, नऊ पदार्थ आणि सात तत्त्वं सांगितली आहेत **(विवहारे जिण उत्तिया)** ती सर्व व्यवहारनयाने सांगितली आहेत. **(ते पयत्त जाणियहि)** त्यांना प्रयत्नपूर्वक जाणावयास हवे.

**सामान्यार्थ :** श्री जिनेंद्र भगवंतांनी जी सहा द्रव्यं, नऊ पदार्थ आणि सात तत्त्वं सांगितली आहेत; ती सर्व व्यवहारनयाने सांगितली आहेत, त्यांना प्रयत्नपूर्वक जाणावयास हवे.

**भावार्थ :** वास्तविक पाहता या विश्वामध्ये द्रव्यांची संख्या जातीच्या अपेक्षेने पाहिली असता जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश व काल अशाप्रकारे केवळ सहा आहेत. गुणांच्या समूहाला द्रव्य म्हणतात. सत् हे द्रव्याचे लक्षण आहे आणि सत् हे उत्पाद, व्यय व ध्रौव्याने असते आहे. प्रत्येक द्रव्य आपापल्या स्वभावामुळे भिन्न आहे/स्वतंत्र आहे, अनादी आहे, अनंत/अविनाशी आहे. द्रव्य अनंतानंत आहेत; तथापि जाती अपेक्षेने द्रव्यांची संख्या वेगवेगळी पाहिली असता जीव द्रव्य अनंत, पुद्‌गल द्रव्य अनंतानंत, धर्म द्रव्य एक, अधर्मद्रव्य एक, आकाशद्रव्य एक आणि कालद्रव्य लोकप्रमाण असंख्यात आहेत.

जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, आणि मोक्ष अशी ही सात तत्त्वं आहेत. जाणण्याच्या अपेक्षेने ही सातही तत्त्वं उपादेय आहेत. प्रगट करण्याच्या अपेक्षेने संवर व निर्जरा उपादेय आहेत. प्राप्त करण्याच्या दृष्टीने मोक्ष तत्त्व उपादेय आहे. **आश्रय करण्याच्या दृष्टीने विचार केला असता एक मात्र जीव तत्त्वच उपादेय आहे.**

वरील सात तत्त्वांमध्ये पुण्य पाप मिळविले असता नऊ पदार्थ होतात.

अशारीतीने शास्त्राधार व युक्तिपूर्वक सर्व जाणावयास हवे. यामुळे दृष्टी (श्रद्धा) दृढ होते व ज्ञान देखील निर्मल व यथार्थ बनते.

**एक जीवच चेतनस्वभावी –**

**सव्व अचेयण जाणि जिय, एक्क सचेयणु सारु।**
**जो जाणेविण परम मुणि, लहु पावइ भव–पारु।।३६।।**

जीव एक चेतन आहे, अन्य सर्व जड जाण।
सारभूत निज ध्यानाने, प्राप्त करी मुनि निर्वाण।।३६।।

**अन्वयार्थ : (सव्व अचेयण जाणि)** पुद्गलादी सर्व पाच द्रव्यं अचेतन/जड जाणा ! **(एक्क जिय सचेयणु सारु )** एक केवळ जीवच चेतन व सारभूत पदार्थ आहे **(परम मुणि जो जाणेविण लहु भवपारु पावइ)** ज्या जीवतत्त्वाचा अनुभव केल्यामुळे परम मुनी भवसागर पार करतात अर्थात मोक्ष प्राप्त करतात.

**सामान्यार्थ :** पुद्गलादी द्रव्य अचेतन आहेत. केवळ एक जीवच चेतन व सारभूत पदार्थ आहे. या जीवतत्त्वाचा अनुभव केल्यामुळे परम मुनी लवकरच भवसागर पार करतात अर्थात मोक्ष–पद प्राप्त करतात.

**व्यवहाराचा मोह त्यागणे आवश्यक –**

**जइ णिम्मलु अप्पा मुणहि, छंडिवि सहु ववहारु।**
**जिण–सामिउ एमइ भणइ, लहु पावइ भवपारु।।३७।।**

जो शुद्धात्मा अनुभवतो, सोडुनि सगळा व्यवहार।
हे श्री जिनवर वचन असे, तो जातो नित भवपार।।३७।।

**अन्वयार्थ : (जइ सहु ववहारु छंडिवि णिम्मलु अप्पा मुणहि)** जर तुम्ही सर्व व्यवहाराला सोडून निर्मल आत्म्याचे ध्यान/अनुभव कराल **(लहु भवपारु पावइ)** तर लवकरच संसाराचा किनारा/मोक्ष प्राप्त कराल **(एहउ जिण–सामिउ भणइ)** असे जिनेंद्र देवांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! जर तुम्ही सर्व व्यवहाराला सोडून अर्थात हेय जाणून (निश्चयनयाच्या विषयाला मुख्य करून) निर्मल

आत्म्याचा अनुभव/ध्यान कराल तर लवकरच संसाराचा किनारा पार करून मोक्ष प्राप्त कराल; असे जिनेंद्र देवांनी सांगितले आहे.

**भावार्थ :** निश्चयनयाचा विषय असलेल्या त्रिकाली, निज शुद्धात्म्याला जो जीव आपल्या श्रद्धेचा विषय बनवितो; त्याच्या श्रद्धेमध्ये भेद, अनित्यता इत्यादी विषय गौण होतात, यालाच येथे व्यवहाराला सोडून अशा शब्दात सांगितले आहे. व्रत व सदाचाराला सोडणे – असा याचा अर्थ करू नये.

**जीवाजीवाचे भेद जाणा –**

**जीवाजीवहँ भेउ जो, जाणइ ते जाणियउ।**
**मोक्खहँ कारण एउ भणइ, जोइ जोइहिं भणिउ ।।३८।।**

जीव अजीव भेदज्ञानी, मोक्ष मोक्षमार्ग नित जाणतसे।
हे योगी ! हे ज्ञान खरे, जे योगीजन सांगतसे ।।३८।।

**अन्वयार्थ : (जोइहिं भणिउ)** योगी पुरुषांनी सांगितले आहे **(जोई)** हे योगीजन हो ! **(जो जीवाजीवाहँ)** जे कोणी जीव व अजीवाचे भेद जाणतात **(ते मोक्खहँ कारण जाणियउ)** ते मोक्षाचे कारण जाणतात **(एउ भणिउ)** असे सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** योगी पुरुषांनी सांगितले आहे – ''हे योगीजनांनो ! जे कोणी जीव व अजीवाचे भेद जाणतात, ते मोक्षाचे कारण देखील जाणतात.''

**भावार्थ :** सर्व शास्त्राचे प्रयोजन (उद्देश) जीवाला भेदज्ञान करविणे हा आहे. भेदज्ञान झाल्यामुळे जीवाला मोक्षमार्ग प्रगट होतो; म्हणजेच भेदज्ञानी जीवांनी मोक्षमार्ग जाणला – असे म्हटले आहे.

**आत्मा केवलज्ञानस्वभावी –**

**केवलणाण–सहाउ सो, अप्पा मुणि जीव तुहुँ।**
**जइ चाहहि सिव–लाहु, भणइ जोइ जोइहिं भणिउँ।।३९।।**

केवलज्ञान–स्वभावी तो, आत्मा जाण जीव आहे।
हे योगी ! योगी सांगे, जर शिव अभिलाषा आहे।।३९।।

**अन्वयार्थ : (जोइहिं भणिउँ)** योगीश्वरांनी सांगितले आहे **(जोई)** हे योगीजन हो ! **(जइ सिव-लाहु-चाहहि)** जर तुम्हाला मोक्षप्राप्तीची इच्छा असेल तर **(केवलणाण-सहाउ अप्पा सो जीव तुहुं मुणि)** केवलज्ञानी जो आत्मा, तोच जीव आहे असे तुम्ही श्रद्धान करा **(भणइ)** असा उपदेश दिला आहे.

**सामान्यार्थ :** योगीश्वरांनी सांगितले आहे – "हे योगी ! जर तुम्हाला मोक्षप्राप्तीची इच्छा असेल तर केवलज्ञानस्वभावी जो आत्मा, तोच जीव आहे असे तुम्ही श्रद्धान करा."

**भावार्थ :** केवलज्ञान ही ज्ञानगुणाची शुद्ध, सुखदायक व पूर्ण पर्याय आहे. चार घाती कर्मांचा नाश झाला असतांना नियमपूर्वक केवलज्ञानपर्याय प्रगट होते. ही अपेक्षा मुख्य करून आत्म्याला केवलज्ञानस्वभावी म्हटले आहे. वास्तविक पाहता आत्मा ज्ञानस्वभावी आहे, केवलज्ञानस्वभावी नाही किंवा शक्तीच्या अपेक्षेने येथे जीवाला केवलज्ञानस्वभावी सांगितले आहे अथवा 'केवल' शब्द ज्ञानापासून अलग केला असता केवल व ज्ञान हे शब्द वेगवेगळे होतात. नंतर 'ज्ञान' शब्द 'स्वभावी' शब्दाबरोबर जोडावा म्हणजे केवल 'ज्ञानस्वभावी' असे होईल. येथे केवल शब्दाचा अर्थ केवळ/फक्त/मात्र करावा. म्हणजे प्रत्येक आत्मा केवळ/फक्त/मात्र ज्ञानस्वभावी आहे; असा याचा अर्थ होतो. ही अपेक्षा देखील समजावी.

**ज्ञानी सर्वत्र आत्माच पाहतो –**

**को सुसमाहि करउ को अंचउ, छोपु अछोपु करिवि को वंचउ।**
**हल सहि कलहु केण समाणउ, जहिं कहिं जोवउ तहिं अप्पाणउ।।४०।।**

पूजा अर्चा कोण करी, आणि समाधी कोण धरी।
स्पर्श आणि अस्पर्श करी, कपट भावना कोण करी।।
कोण कुणाचा मित्र असे, कोण कुणाचा शत्रु असे।
यत्र तत्र सर्वत्र जगी, ज्ञानीला आत्माच दिसे।।४०।।

**अन्वयार्थ : (सुसुमाहि को करउ)** समाधी कोण करणार ? **(अंचउ को)** अर्चना-पूजा कोणी करावयाची ? **(छोपु अछोपु करिवि वंचउ को)** स्पृश्य-अस्पृश्याचा विकल्प करून मायाचारी कोणी व्हावे ?**(केण सहि हल कलहु समाणउ)** कुणी कुणाशी मैत्री वा शत्रुता करावयाची ? **(जहिं कहिं जोवउ तहिं अप्पाणउ)** जेथे पहावे तेथे सर्वत्र आत्माच दिसतो.

**सामान्यार्थ :** समाधी कोण करणार ? अर्चना-पूजा कोणी करावयाची ? स्पृश्य-अस्पृश्याचा विकल्प करून मायाचारी कोणी व्हावे ? कुणी कुणाशी मैत्री वा शत्रुता करावयाची ? जेथे पहावे तेथे सर्वत्र ज्ञानीला आत्माच दिसतो.

**भावार्थ :** ज्याची दृष्टी आत्मकेंद्रित होते, त्याच्या अंतरंगाची जी दशा होते, त्याचे हे कथन आहे. साधकाला एक निज भगवान आत्माच सर्वत्र मुख्य असतो, अन्य सर्व गौण होतात.

**आत्मज्ञान रहित जीव कुतीर्थातच भटकतो –**

**ताम कुतित्थिइँ परिभमइ, धुत्तिम ताम करेइ ।**
**गुरुहु पसाएँ जाम णवि, अप्पा-देउ मुणेइ ।।४१।।**

गुरु उपदेशे आत्म्याला, जोवर देव न जाणतसे ।
तोवर मिथ्यामार्गी तो, धूर्त जीव नित फिरत असे ।।४१।।

**अन्वयार्थ :** संसारी जीव **(जाव गुरुहु पसाएँ अप्पा-देउ णवि मुणेइ)** जोपर्यंत गुरूच्या प्रसादाने आत्मरूपी देवाला मानत/स्वीकारत नाही **(ताव कुतित्थइँ परिभमइ)** तोपर्यंत जीव मिथ्या तीर्थामध्ये वारंवार भटकत राहतो **(ताव धुत्तिम करेइ)** व तोपर्यंत धूर्तता पण करीत राहतो.

**सामान्यार्थ :** जोपर्यंत गुरूच्या प्रसादाने संसारी जीव निज आत्मरूपी देवाला मानत/स्वीकारत नाही, तोपर्यंत मिथ्या तीर्थामध्ये वारंवार भटकत राहतो. तसेच धूर्तता पण करीत राहतो.

**शरीरस्थ जीवच वास्तविक तीर्थ व मंदिर –**

**तित्थहिं देवलि देउ णवि, इम सुइकेवलि वुत्तु।**
**देहा–देवलि देउ जिणु, एहउ जाणि णिरुत्तु।।४२।।**

तीर्थ मंदिरी देव नसे, देहातच जिनदेव वसे।
श्री श्रुतकेवलि देव म्हणे, निश्चय तर हाच असे।।४२।।

**अन्वयार्थ : (तित्थहिं देवलि देउ णवि)** तीर्थक्षेत्री व मंदिरामध्ये जिनेंद्र परमात्म देव नाहीत **(देहा–देवलि जिणु देउ)** देहरूपी देवालयामध्ये जिनेंद्र देव आहेत **(णिरूत्तु एहउ जाणि)** निश्चयाने/ वास्तविक असेच जाणा **(इम सुइकेवलि वुत्तु)** अशाप्रकारे श्रुतकेवलींनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** "तीर्थक्षेत्री व मंदिरामध्ये जिनेंद्र परमात्म देव नाहीत. देहरूपी देवालयामध्ये जिनेंद्र देव आहेत" – असे वास्तविक जाणा; अशाप्रकारे श्रुतकेवलींनी सांगितले आहे.

**जिनेंद्र देव देवालयात नाहीत –**

**देहा–देवलि देउ जिणु, जणु देवलिहिं णिएइ।**
**हासउ महु पडिहाइ इहु, सिद्धे भिक्ख भमेइ।।४३।।**

तन मंदिरात जिन आहे, जन मंदिरि मूढच पाहे।
हे पाहुनिया मी हसतो, सिद्ध भीक मागत आहे।।४३।।

**अन्वयार्थ : (जिणु देउ देहा–देवलि)** श्री जिनेंद्र देव, देह–देवालयामध्ये आहेत **(जणु देवलिहिं णिएइ)** परंतु अज्ञानी जन त्यांना देवालयात शोधत फिरतात **(महु हासउ पडिहाइ)** हे मला हास्यास्पद वाटते **(इहु सिद्धे भिक्ख भमेइ)** जणु सिद्ध भगवान भीक मागत फिरत आहेत.

**सामान्यार्थ :** श्री जिनेंद्र देव, देह–देवालयामध्ये आहेत; परंतु अज्ञानी जन, साक्षात् जिनेंद्र देवांना देवालयात शोधत फिरतात. हे मला हास्यास्पद वाटते. जणु काही सिद्ध भगवान भीक मागत फिरत आहेत – असे वाटते.

**देह-देवालयामध्ये जिनदेवांना पहा –**

**मूढा देवलि देउ ण वि, ण वि सिलि लिप्पइ चित्ति।**
**देहा देवलि देउ जिणु, सो बुज्झहि समचित्ति।।४४।।**

रे मूढा ! जिनदेव नसे, मंदिर मूर्ती चित्रात।
साक्षात्कार करा त्याचा, जो आहे निज देहात।।४४।।

**अन्वयार्थ : (मूढा)** हे मूर्खा ! **(देउ देवलि णवि)** परमात्म/जिनेंद्र देव कोणत्याही देवळात नाहीत **(सिलि लिप्पइ चित्ति णवि)** अथवा पाषाण, लेप वा चित्रामध्ये देखील नाहीत **(जिणु देउ देहा-देवलि)** जिनेंद्र देव तर देह-देवालयामध्ये आहेत **(समचित्ति सो बुज्झहि)** त्यांना समता/वीतराग परिणामांनी जाणावयास हवे.

**सामान्यार्थ :** हे मूर्ख ! परमात्म जिनेंद्र देव कोणत्याही मंदिरात नाहीत किंवा पाषाण, लेप वा चित्रामध्ये देखील नाहीत. जिनेंद्र देव तर देह-देवालयामध्ये विराजमान आहेत. त्यांना समता/वीतराग परिणामांनी जाणावयास हवे.

**ज्ञानीच, देह-देवालयात जिनेंद्रांना पाहतो –**

**तित्थइ देवलि देउ जिणु, सव्वु वि कोइ भणेइ।**
**देहा-देवलि जो मुणइ, सो बुहु को वि हवेइ।।४५।।**

तीर्थ मंदिरी देव असे, सर्व लोक हे म्हणतात।
जिन प्रभुला सम्यग्ज्ञानी, पाहे नित निज देहात।।४५।।

**अन्वयार्थ : (सव्वु वि कोइ भणेइ)** सर्व जण अर्थात बहुभाग लोक म्हणतात की **(तित्थइ देवलि देउ जिणु)** तीर्थक्षेत्री व मंदिरामध्ये जिनदेव आहेत **(जो देहा-देवलि मुणइ)** तथापि जो कोणी देहरूपी देवालयामध्ये जिनदेवांना पाहतो/मानतो **(सो को वि बुहु हवेइ)** तो कोणी एखादाच विरळा ज्ञानी असतो.

**सामान्यार्थ :** सर्वजण अर्थात बहुभाग लोक म्हणतात की तीर्थक्षेत्री व मंदिरामध्ये जिनदेव आहेत. तथापि जो कोणी देहरूपी

देवालयामध्ये जिनदेवांना पाहतो/मानतो, तो कोणी एखादाच विरळा ज्ञानी असतो.

**धर्म रसायनाचे प्राशन करा –**

**जइ जर–मरण–करालियउ, तो जिय धम्म करेहि।**
**धम्म–रसायणु पियहि तुहुँ, जिम अजरामर होइ।।४६।।**

जन्म मरण भय आहे, धर्मलाभ घे हे जीवा।
धर्म रसायन प्राशुनिया, अजर अमर हो हे जीवा।।४६।।

**अन्वयार्थ : (जिय)** हे जीवांनो ! **(जइ जर–मरण–करालियउ)** जर तुम्ही जन्म, जरा, मरणादिक दुःखांनी भयंभीत झाला असाल **(तो धम्म करेहि)** तर धर्म करा **(तुहुँ धम्मरसायणु पियहि)** तुम्ही धर्मरूपी रसायनाचे प्राशन करा **(जि अजरामर होइ)** की ज्यायोगे तुम्ही अजर–अमर व्हाल.

**सामान्यार्थ :** जर तुम्ही मरणादिक दुःखांनी भयभीत झाला असाल तर धर्म करा. तुम्ही धर्मरूपी रसायनाचे प्राशन करा की ज्यायोगे तुम्ही अजर–अमर व्हाल.

**धर्म, बाह्यक्रियेमध्ये नाही –**

**धम्मु ण पढियइँ होइ, धम्मु ण पोत्था–पिच्छियइँ।**
**धम्मु ण मढिय–पएसि, धम्मु ण मत्था लुंचियइँ।।४७।।**

शास्त्र पठन हा धर्म नव्हे, पिच्छी धारण धर्म नव्हे।
केशलोच हा धर्म नव्हे, मठ निवास हा धर्म नव्हे।।४७।।

**अन्वयार्थ : (पढियइँ धम्मु ण होइ)** शास्त्र पठन केल्यामुळे धर्म होत नाही **(पोत्था–पिच्छियइँ धम्मु ण)** पोथी/शास्त्र व पिच्छी जवळ बाळगल्यामुळे धर्म होत नाही **(मढिय पएसि धम्मु ण)** कोणत्याही मठामध्ये निवास केल्याने धर्म होत नाही **(मत्था लुंचियइँ धम्मु ण)** केशलोच केल्यामुळे देखील धर्म होत नाही.

**सामान्यार्थ :** शास्त्र-पठन केल्यामुळे धर्म होत नाही. पोथी/शास्त्र व पिच्छी जवळ बाळगल्यामुळे धर्म होत नाही. कोणत्याही मठामध्ये निवास केल्यामुळे धर्म होत नाही. एवढेच नव्हे तर केशलोच केल्यामुळे देखील धर्म होत नाही.

**आत्मस्थ झाल्यानेच धर्म –**

**राय-रोस बे परिहरिवि, जो अप्पाणि वसेइ।**
**सो धम्मु वि जिण-उत्तियउ, जो पंचम गइ णेइ ।।४८।।**

राग-द्वेष मल सोडुनि जो, निज आत्म्यात लीन होतो।
जिनेश्वरांनी सांगितले, तो निश्चित मोक्षा जातो ।।४८।।

**अन्वयार्थ : (राय-रोस बे परिहरिवि)** राग-द्वेष दोहोंचा त्याग करून **(जो अप्पाणि वसेइ)** जो आपल्या आत्म-स्वभावामध्ये निवास करतो/आत्मस्थ होतो **(सो धम्मु जिण वि उत्तियउ)** त्यालाच जिनेंद्र भगवंतांनी धर्म म्हणून म्हटले आहे **(जो पंचम गइ णेइ)** हाच धर्म पंचम गतीला/मोक्षाला पोहोचवितो.

**सामान्यार्थ :** राग-द्वेष दोहोंचा त्याग करून जो आत्मा आत्मस्वभावामध्ये निवास करतो/आत्मस्थ होतो, त्यालाच जिनेंद्र भगवंतांनी धर्म म्हणून म्हटले आहे. हाच धर्म पंचम गतीला/मोक्षाला पोहोचवितो.

**भावार्थ :** जीव द्रव्याची वीतरागी पर्यायच धर्म होय. समता, शांती, समाधान, समभाव, संवर, निर्जरा, मोक्ष हे सर्व धर्माला स्पष्ट करणारे अन्य शब्द समजावेत. असा हा वास्तविक धर्म प्रगट झाला असतांना अथवा प्रगट होण्यासाठी जे बाह्य उपाय आहेत; त्यांना देखील शास्त्रामध्ये व्यवहाराने धर्म शब्दाने संबोधित केले आहे.

**मोहभावच संसारभ्रमणाचे कारण –**

**आउ गलइ णवि मणु गलइ, णवि आसा हु गलइ।**
**मोहु फुरइ णवि अप्प-हिउ, इम संसार भमेइ ।।४९।।**

आयु क्षीण नित होत असे, पण मन तृष्णा कधि न मरे।
मोह आत्म हित पथ झाकी, म्हणुनि जीव जगतात फिरे।।४९।।

**अन्वयार्थ : (आउ गलइ)** आयु सतत घटत राहते **(मणु णवि गलइ)** क्रोधादि कषाय क्षीण होत नाहीत **(आसा णवि गलइ)** पंचेंद्रिय भोगांची आशा/इच्छा कमी होत नाही **(मोह फुरइ)** मोहाचा पगडा वाढत जातो **(अप्पहिउ णवि)** परंतु आत्महिताचा भाव प्रबल होत नाही **(इम संसार भमेइ)** याप्रकारे जीव संसारामध्ये भ्रमण करीत आहे.

**सामान्यार्थ :** आयु सतत घटत राहते, क्रोधादि कषाय परिणाम क्षीण होत नाहीत. पंचेंद्रिय भोगाची इच्छा कमी होत नाही. उलट मोहाचा पगडा वाढत जातो; परंतु आत्महिताचा भाव प्रबल होत नाही -- अशाप्रकारे जीव संसारामध्ये भ्रमण करीत आहे.

**आत्मज्ञानच निर्वाणाचे कारण –**

**जेहउ मणु विसयहँ रमइ, तिमु जइ अप्प मुणेइ।**
**जोइउ भणइ हो जोइयहु, लहु णिव्वाणु लहेइ ।।५०।।**

मन रमते विषयात जसे, तसे रमे निज आत्म्यात।
हे योगी ! योगी म्हणती, ते जाइ शिव नगरात ।।५०।।

**अन्वयार्थ : (जोइउ भणइ)** योगीश्वर उपदेश देतात की **(हो जोइयहु)** हे योगीजनांनो ! **(मणु जेहउ विसयहँ रमइ)** मन ज्याप्रमाणे विषयामध्ये रममाण होते **(जइ तिम अप्प मुणेइ)** त्याचप्रमाणे आत्मज्ञानामध्ये तुम्ही आपले मन रममाण केले तर **(लहु णिव्वाणु लहेइ)** अति अल्प कालावधीत निर्वाण पद मिळेल.

**सामान्यार्थ :** योगीश्वर उपदेश देतात – "हे योगीजनांनो ! मन ज्याप्रमाणे सहज विषयामध्ये रममाण होते, त्याचप्रमाणे आत्मज्ञानामध्ये तुम्ही मन रममाण केले तर अति अल्प कालावधीत निर्वाणपद मिळेल."

**निर्मल निजात्मभावनाच मोक्षदाता –**

**जेहउ जज्जरू णरय घरू, तेहउ बुज्झि सरीरु।**
**अप्पा भावहि णिम्मलउ, लहु पावहि भवतीरु ।।५१।।**

नरक वास सम दुखकारी, हेच मलीन शरीर असे।
शुद्धात्म्याचा भाव सदा, शाश्वत शिव सुख देत असे।।५१।।

**अन्वयार्थ : (जेहउ णरय घरू जज्जरु)** जसे नरक-निवास अनेक छिद्ररूपी आपत्तीने सहित आहे **(तेहउ सरीरु बुज्झि)** तसे शरीर देखील मल, मूत्र, रोग इत्यादी आपत्तीने सहित आहे असे जाणा. **(णिम्मलउ अप्पा भावहि)** निर्मल निज शुद्धात्म्याची भावना/ध्यान करा **(लहु भवतीरु पावहि)** की ज्यायोगे लवकरच संसारतीराची/मोक्षपदाची प्राप्ती होईल.

**सामान्यार्थ :** जसे नरक-निवास अनेक छिद्ररूपी आपत्तीने सहित आहे; तसे शरीर देखील मल, मूत्र , रोग आदि आपत्तीने सहित आहे, असे जाणा. म्हणूनच निर्मल निज शुद्धात्म्याची भावना करा; ज्यायोगे लवकरच मोक्षपदाची प्राप्ती होईल.

**व्यवहारमग्न जीव, आत्मस्वरूप जाणत नाही –**

**धंधइ पडियउ सयल जगि, णवि अप्पा हु मुणंति।**
**तहिं कारणि ए जीव फुड्ड, ण हु णिव्वाणु लहंति।।५२।।**

जे प्राणी संसाराच्या, फसले नित्य प्रपंचात।
आत्म्याच्या ज्ञानाविण ते, जात नसे कधि मोक्षात।।५२।।

**अन्वयार्थ : (सयल जगि धंधइ पडियउ)** सर्व जगत अर्थात जगातील सर्व मनुष्य आपापल्या धंद्यामध्ये व्यस्त आहेत **(अप्पा हु णवि मुणंति)** म्हणून वास्तविक आत्मस्वभावाला जाणत व मानत नाहीत **(तहिं कारणि ए जीव णिव्वाणु ण हु लहंति फुड्ड)** याच कारणामुळे जीव मोक्षाची प्राप्ती करू शकत नाही; ही बाब सत्य आहे.

**सामान्यार्थ :** सर्व जगत अर्थात जगातील सर्व मनुष्य आपापल्या धंद्यात व्यस्त आहेत. म्हणून वास्तविक आत्मस्वभावाला जाणत नाहीत व मानत देखील नाहीत. याच कारणामुळे जीव मोक्षाची प्राप्ती करू शकत नाही; ही बाब सत्य आहे.

**भावार्थ :** नारकी दुःखाने त्रस्त आहेत. देव भोगात मस्त आहेत. तिर्यंच आत्मस्वभावाला जाणण्याची अनूकूलता नसल्यामुळे संत्रस्त

आहेत. म्हणून आम्हा मनुष्यांनी वेळात वेळ काढून आत्मस्वभाव जाणून घ्यावयास हवा.

**आत्मज्ञानाशिवाय शास्त्रवाचन निष्फळ –**

**सत्थ–पढंतह ते वि जड, अप्पा जे ण मुणंति।**
**तहिं कारणि ए जीव फुडु, ण हु णिव्वाणु लहंति।।५३।।**

आत्म्याच्या ज्ञानाविण ते, शास्त्र पठन नित व्यर्थ असे।
या कारण जड प्राणी ते, मोक्षाला कधि जात नसे।।५३।।

**अन्वयार्थ : (सत्थ पढंतह जे अप्पा ण मुणंति ते वि जड)** शास्त्र-वाचन करणारे जर आत्मानुभव करीत नसतील तर ते देखील अज्ञानीच आहेत **(तहिं कारणि ए जीव फुडु ण णिव्वाणु लहंति)** याच कारणाने असे शास्त्र–पाठी देखील मोक्ष मिळवू शकत नाहीत; ही गोष्ट स्पष्ट आहे.

**सामान्यार्थ :** शास्त्रवाचन करणारे जर आत्मानुभव करीत नसतील तर ते देखील अज्ञानी आहेत. याच कारणाने असे शास्त्र-पाठी देखील मोक्ष मिळवू शकत नाहीत; ही गोष्ट स्पष्ट आहे.

**विषयविरक्तीमुळे आत्मानुभव सहज –**

**मणु–इंदिहि वि छोडियइ, बुहु पुच्छियइ ण कोइ।**
**रायहँ पसरू णिवारियइ, सहज उपज्जइ सोइ।।५४।।**

इंद्रिय चित्त निरोधाने, जेव्हा राग भाव हा मरतो।
बहु पृच्छा व्यर्थचि तेव्हा, आत्मबोध सहजचि होतो।।५४।।

**अन्वयार्थ : (बुहु मणु इंदिहि वि छोडियइ)** जर बुद्धिमान, मन तथा इंद्रियांना विषयांपासून सोडवेल **(कोइ ण पुच्छियइ)** तर स्वत:ला आत्मानुभव झाला आहे वा नाही असे कोणालाही विचारण्याची जरूरी नाही **(रायहँ पसरू णिवारियइ)** जेव्हा राग-द्वेषादी परिणामांच्या विस्ताराला रोकले जाते **(सहज सोइ उपज्जइ)** तेव्हा आत्मज्ञानाची/आत्मानुभवाची उत्पत्ती स्वाभाविक रीतीने होते.

**सामान्यार्थ :** जर बुद्धिमान मनुष्य, मन तथा इंद्रियांना विषयांपासून सोडवेल तर स्वत:ला आत्मानुभव झाला आहे वा नाही असे कोणालाही विचारण्याची जरूरी नाही. जेव्हा राग-द्वेषादि परिणामांच्या विस्ताराला रोकले जाते, तेव्हा आत्मानुभवाची/ आत्मज्ञानाची उत्पत्ती स्वाभाविक रीतीनेच होते.

**भावार्थ :** येथे विषयांपासून विरक्ती हे कार्य आहे आणि जर कार्य व्यक्त झाले आहे तर आत्मज्ञान हे कारण निश्चितच आहे, असे विश्वासपूर्वक आचार्य योगींदुदेवांनी सांगितले आहे. यावरून आत्मानुभवी मनुष्य विषयासक्त असत नाही व आत्मानुभवीला आपल्या आत्मानुभवाचे ज्ञान निश्चितच होते; अशा दोन्ही विषयांचा स्पष्ट खुलासा केला आहे.

**पुद्गलादीपासून जीव भिन्न –**

**पुग्गलु अण्णु जि अण्णु जिउ, अण्णु जि सहु ववहारु।**
**चयहि वि पुग्गलु गहहि जिउ, लहु पावहि भवपारु।।५५।।**

जीव नि पुद्गल भिन्न असे, भिन्न जाण जग व्यवहार।
सोड पुद्गला धर जीवा, होशिल तू क्षणि भवपार।।५५।।

**अन्वयार्थ : (पुग्गलु अण्णु जि)** मूर्त स्वभावी पुद्गल, जीवापासून भिन्न आहे **(जिउ अण्णु)** जीवाचा स्वभाव पुद्गलादी द्रव्यांपासून भिन्न आहे **(सहु ववहारु अण्णु जि)** तसेच अन्य सर्व व्यवहार देखील जीवापासून भिन्न आहेत **(पुग्गलु चयहि वि जिउ गहहि)** पुद्गलादि अन्य सर्व द्रव्यांचा त्याग करून जर तुम्ही अनादीअनंत अशा निज शुद्धात्म्याला ग्रहण कराल **(लहु भव-पारु पावहि)** तर लवकरच मोक्षपद मिळवाल.

**सामान्यार्थ :** मूर्तस्वभावी पुद्गल, जीवापासून भिन्न आहे. जीवाचा स्वभाव, पुद्गलादी द्रव्यांपासून भिन्न आहे. तसेच अन्य सर्व व्यवहार देखील जीवापासून भिन्न आहे. पुद्गलादी अन्य सर्व द्रव्यांचा

त्याग करून जर तुम्ही अनादीअनंत अशा निज शुद्धात्म्याला ग्रहण कराल तर लवकरच मोक्षपद मिळवाल.

**आत्मानुभवी जीवच संसारातून मुक्त होतो –**

**जो णवि मण्णहिं जीव फुडु, जे णवि जीउ मुणंति।**
**ते जिण–णाणहँ उत्तिया, णउ संसार मुंचंति।।५६।।**

जे न जाणती आत्म्याला, ज्यांना निज अनुभूति नसे।
जिन देवांनी सांगितले, मुक्त कधी ते होत नसे।।५६।।

**अन्वयार्थ : (जे फुडु जीव णवि मण्णहिं)** जे स्पष्टरूपाने आपल्या आत्म्याला जाणत नाहीत **(जे जीउ णवि मुणंति)** व जे आपल्या आत्म्याचा अनुभव करीत नाहीत **(ते संसार णउ मुंचति)** ते जीव संसारातून मुक्त होत नाहीत **(जिण णाणहँ उत्तिया)** असे जिनेंद्र देवांनी उपदेशिले आहे.

**सामान्यार्थ :** जे स्पष्टरूपाने आपल्या आत्म्याला जाणत नाहीत व जे आपल्या आत्म्याचा अनुभव पण करीत नाहीत, ते जीव संसारातून मुक्त होत नाहीत; असे जिनेंद्र देवांनी उपदेशिले आहे.

**आत्मज्ञानासाठी नऊ दृष्टांत –**

**रयण दीउ दिणयर दहिउ, दुध्दु घीव पाहाणु।**
**सुण्णउ रुउ फलिहउ अगिणि, णव दिट्ठंता जाणु।।५७।।**

रत्न दीप रवि दूध दही, घृत कंचन अन पाषाण।
रजत अग्नि मणि आत्म्याचे, नउ दृष्टांत असे जाण।।५७।।

**अन्वयार्थ : (रयण दीउ दिणयर दहिउ दुध्दु घीव पाहाणु सुण्णउ रुउ फलिहउ अगिणि)** रत्न, दीप, सूर्य, दही, दूध, तूप, पाषाण, सुवर्ण, चांदी, स्फटिकमणी आणि अग्नी **(णव दिट्ठंता जाणु)** असे नऊ दृष्टांत जाणावेत.

**सामान्यार्थ :** रत्न, दीप, सूर्य, दही, दूध, तूप, पाषाण, सुवर्ण, चांदी, स्फटिकमणी आणि अग्नी – असे नऊ दृष्टांत जाणावेत.

**भावार्थ : १) रत्नं :** आत्मा रत्नाप्रमाणे अनुपम आहे.

**२) दीप :** आत्मा दीपकाप्रमाणे स्व-पर प्रकाशक आहे.

**३) सूर्य :** आत्मा सूर्यासमान प्रकाशमान व प्रतापवान आहे.

**४) दूध :** दुधामध्ये जसे नियमपूर्वक तूप असते, तसे आत्म्यामध्ये आज, आता भगवानपणा गुप्त आहे. **दही :** दह्यामध्ये जसे नियमपूर्वक तूप असते, तसे आत्म्यामध्ये आज-आता भगवानपणा गुप्त आहे. **तूप :** तूप जसे पुन्हा कधीही दही वा दूध होणारच नाही, तसे आत्मा एकदा संसारातून मुक्त झाला असता परत संसारात येत नाही – असे समजावे.

**५) पाषाण :** आत्मा दगडाप्रमाणे दृढ तसेच अमीट आहे.

**६) सुवर्ण :** आत्मा शुद्ध सुवर्णाप्रमाणे प्रकाशमान अशा ज्ञानरूपी धातुने बनलेला आहे.

**७) चांदी :** आत्मा शुद्ध चांदीप्रमाणे निर्मल आहे.

**८) स्फटिकमणी :** आत्मा स्फटिक मण्यासमान निर्मल आणि परिणमनशील आहे.

**९) अग्नी :** आत्मा अग्नीसमान जाज्वल्यमान आहे.

**'मी देहादीरूप नाही', हे ज्ञान मोक्षाचे बीज –**

**देहादिउ जो परु मुणइ, जेहउ सुण्णु अयासु ।**
**सो लहु पावइ बंभु परु, केवलु करइ पयासु ।।५८।।**

आकाशा सम जीवाचा, देहाशी संबंध नसे ।
हे जाणी तो ब्रह्म बने, प्रकाश त्याचा पसरतसे ।।५८।।

**अन्वयार्थ : (जेहउ अयासु सुण्णु)** जसे आकाश पर पदार्थांच्या संयोगाने रहित म्हणजेच असंगस्वभावी आहे, एक आहे **(देहादिउ सो परू मुणइ)** तसेच शरीरादीकांना जो जीव आत्म्याहून भिन्न मानतो **(सो परु बंभु लहु पावइ)** तो परब्रह्मस्वरूप निज आत्म्याला शीघ्र प्राप्त करतो **(केवल पयासु करइ)** व क्रमाने केवलज्ञानरूप प्रकाश करतो म्हणजेच केवलज्ञानी होतो.

**सामान्यार्थ :** जसे आकाश, पर पदार्थांच्या संयोगाने रहित म्हणजेच असंगस्वभावी आहे, एक आहे. तसेच जो जीव शरीरादिकांना आत्म्याहून भिन्न मानतो, तो परब्रह्मस्वरूप निज आत्म्याला शीघ्र प्राप्त करतो व क्रमाने केवलज्ञानरूप प्रकाश करतो, म्हणजेच केवलज्ञानी होतो.

**मी आकाशाप्रमाणे शुद्ध असूनही चेतन –**

**जेहउ सुद्ध अयासु जिय, तेहउ अप्पा वुत्तु।**
**आयासु वि जडु जाणि जिय, अप्पा चेयणुवंतु।।५९।।**

आकाश सम शुद्ध सदा, जीव असे हा जगतात।
जड आकाश जीव चेतन, तत्त्व ठेव हे ध्यानात।।५९।।

**अन्वयार्थ : (जिय)** हे जीवांनो ! **(जेहउ आयासु सुद्ध तेहउ अप्पा वुत्तु)** जसे आकाश शुद्ध आहे, तसेच आत्मा शुद्धच सांगितला गेला आहे **(जिय आयास वि जडु जाणि)** हे जीवांनो ! आकाशाला जड व **(अप्पा चेयणुवंत्तु)** आत्म्याला चेतन जाणा.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! जसे आकाश शुद्ध आहे, तसेच आत्मा देखील शुद्ध सांगितला गेला आहे. हे जीवांनो ! तुम्ही आकाशाला जड (अचेतन) जाणा आणि आत्म्याला चेतन जाणा.

**निजशुद्धात्मानुभवाने संसाराचा नाश –**

**णासग्गिं अब्भितरहँ, जे जीवहिं असरीरु।**
**बाहुडि जम्मि ण संभवहिं, पिवहिं ण जणणी–खीरु।।६०।।**

ध्यान करितसे जे ज्ञानी, नित अशरीरी आत्म्याचे।
ते नच घेई जन्म पुनः, दूध पिण्याला मातेचे।।६०।।

**अन्वयार्थ : (जे णासग्गिं अब्भितरहँ असरीरु जीवहिं)** जे नासाग्र दृष्टी ठेवून अंतरस्थित अशरीरी निज शुद्धात्म्याला पाहतात/अनुभवतात **(बाहुडि जम्मि ण संभवहिं)** ते पुन्हा लज्जास्पद असा जन्म घेत नाहीत **(जणणी खीरु ण पिवहिं)** आणि मातेचे दूधही पीत नाहीत.

**सामान्यार्थ :** जे नासाग्र दृष्टी ठेवून अंतरस्थित अशरीरी निज शुद्धात्म्याला अनुभवतात, ते पुन्हा लज्जास्पद असा जन्म घेत नाहीत व मातेचे दूधही पीत नाहीत.

**अशरीरी शुद्धात्म्याला, ज्ञानशरीरी जाणा –**

**असरीरू वि सुसरीरू मुणि, इहु सरीरु जडु जाणि।**
**मिच्छा–मोहु परिच्चयहि, मुत्ति णियं वि ण माणि।।६१।।**

नित शरीरी जीवाचे, ज्ञान शरीर असे जाण।
मिथ्यात्वाला सोडुनिया, मूर्तिक तन तू जड जाण।।६१।।

**अन्वयार्थ : (असरीरू वि सुसरीरू मुणि)** अशरीरी आपल्या शुद्धात्म्याला सुंदर अर्थात ज्ञानशरीरी समजावे **(इहु सरीरु जडु जाणि)** या पुद्‌गलात्मक शरीराला जड/अचेतन जाणावे **(मिच्छा–मोह परिच्चयहि)** मिथ्या मोहाचा त्याग करावा **(मुत्ति णियं वि ण माणि)** मूर्तीक शरीराला आपले मानू नये.

**सामान्यार्थ :** अशरीरी आपल्या शुद्धात्म्याला सुंदर अर्थात ज्ञानशरीरी समजावे. या पुद्‌गलात्मक शरीराला जड/अचेतन जाणावे. मिथ्या मोहाचा त्याग करावा आणि मूर्तिक शरीराला आपले मानू नये.

**आत्मश्रद्धेचे फळ –**

**अप्पइँ अप्पु मुणंतयहँ, किं णेहा फलु होइ।**
**केवलणाणु वि परिणवइ, सासय सुक्खु लहेइ।।६२।।**

निज अनुभव जीवा येता, जगी कोणते फळ न मिळे?
केवलज्ञान प्रभा प्रगटे, अनंत अक्षय सुखचि मिळे।।६२।।

**अन्वयार्थ : (अप्पइ अप्पु मुणंतयहँ)** आत्म्याची आत्मरूपाने श्रद्धा केली असता **(किं णेहा फलु होइ)** या विश्वामध्ये असे कोणते फळ आहे की जे प्राप्त होत नाही ? **(केवलणाणु वि परिणवइ)** आपले अल्पज्ञान केवलज्ञानरूप परिणमित होते **(सासय–सुक्खु लहेइ)** एवढेच नव्हे तर अविनाशी सुखाची प्राप्ती होते.

**सामान्यार्थ :** आपल्या आत्म्याची आत्मरूपाने श्रद्धा केली असता या विश्वामध्ये असे कोणते फळ आहे की जे प्राप्त होत नाही ? आपले अल्प ज्ञान, पूर्ण ज्ञान (केवलज्ञान) रूप परिणमित होते. एवढेच नव्हे तर अविनाशी सुखाची प्राप्ती होते.

**आत्मानुभवाचे फळ मोक्ष –**

**जे परभाव चएवि मुणि, अप्पा अप्प मुणंति।**
**केवलणाण–सरूव लइ, ते संसारु मुंचंति।।६३।।**

परभावा सोडुनि मुनि जे, निज आत्म्यात सदा रमती।
केवलज्ञान प्रगट करूनी, ते भव सिंधु तरूनि जाती।।६३।।

**अन्वयार्थ : (जे मुणि परभाव चएवि अप्प अप्पा मुणंति)** जे मुनीश्वर परभावांचा त्याग करून आपल्या आत्म्याचा स्वयमेव अनुभव करतात, **(ते केवलज्ञान–सरूव लइ संसारु मुचंति)** ते केवलज्ञान स्वरूपाला प्राप्त करून संसाराचा त्याग करतात, म्हणजेच मोक्षाची प्राप्ती करतात.

**सामान्यार्थ :** जे मुनीश्वर परभावांचा त्याग करून आपल्या आत्म्याचा स्वयमेव अनुभव करतात, ते केवलज्ञानरूप स्वरूपाला प्राप्त करून संसाराचा त्याग करतात म्हणजेच मोक्षाची प्राप्ती करतात.

**आत्मध्यानी त्यागी धन्य –**

**धण्णा ते भयवंत बुह, जे परभाव चयंति।**
**लोयालोय–पयासयरु, अप्पा विमल मुणंति।।६४।।**

परभावांना सोडुनि जे, मग्न होतसे निज ध्यानी।
लोकालोक प्रकाशक जे, ते भगवंत धन्य ज्ञानी।।६४।।

**अन्वयार्थ : (जे परभाव चयंति)** जे परभावांचा त्याग करतात **(लोयालोय–पयासयरु–विमल अप्पा मुणंति)** आणि लोकालोक प्रकाशक अशा निर्मल निज शुद्धात्म्याचा अनुभव करतात **(ते भयवंत बुह धण्णा)** ते भगवान ज्ञानी महापुरुष धन्य आहेत.

**सामान्यार्थ :** जे परभावांचा त्याग करतात आणि लोकालोक प्रकाशक अशा निर्मल निज शुद्धात्म्याचा अनुभव करतात, ते भगवान ज्ञानी महापुरुष धन्य आहेत.

**आत्मरमणताच सिद्धसुखाचा उपाय –**

**सागारु वि णागारु कु वि, जो अप्पाणि वसेइ।**
**सो लहु पावइ सिद्धी–सुहु, जिणवरु एम भणेइ।।६५।।**

गृहस्थ वा मुनिराज कुणी, जे निज आत्म्यातच रमती।
तेच सिद्ध सुख प्राप्त करी, हे श्री जिनवर प्रभु म्हणती।।६५।।

**अन्वयार्थ : (सागारु वि णागारु कु वि)** गृहस्थ वा मुनी कोणीही असो **(जो अप्पाणि वसेइ)** जो आपल्या आत्म्यामध्ये निवास करतो **(सो सिद्धी सुहु लहु पावइ)** तो सिद्ध सुखाला लवकरच प्राप्त करतो **(एम जिणवरु भणेइ)** अशाप्रकारे जिनेंद्र देवांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** गृहस्थ वा मुनी कोणीही असो, जो आपल्या आत्म्यामध्ये निवास करतो, तो सिद्ध सुखाला लवकरच प्राप्त करतो; अशाप्रकारे जिनेंद्र देवांनी सांगितले आहे.

**तत्त्वज्ञानी विरळ –**

**विरला जाणहिं तत्तु बुह, विरला णिसुणहिं तत्तु।**
**विरला झायहिं तत्तु जिय, विरला धारहिं तत्तु।।६६।।**

तत्त्व जाणतो कुणि विरळा, तत्त्व ऐकतो कुणि विरळा।
तत्त्व जगतसे कु णि विरळा, निज अनुभव घेतो विरळा।।६६।।

**अन्वयार्थ : (विरला बुह तत्तु जाणहिं)** विरळेच विद्वान लोक तत्त्वं जाणतात **(विरला तत्तु णिसुणहिं)** विरळेच श्रोते तत्त्वं ऐकतात **(विरला जिय तत्तु झायहिं)** विरळेच जीव तत्त्वांचे मनन–चिंतन करतात आणि **(विरला तत्तु धारहिं)** विरळेच साधक जीव तत्त्वांना धारण करून आत्मानुभवी होतात.

**सामान्यार्थ :** विरळेच विद्वान लोक, तत्त्व जाणतात. विरळेच श्रोते, तत्त्व ऐकतात. विरळेच जीव, तत्त्वांचे मनन-चिंतन करतात आणि विरळेच साधक, जीव तत्त्वाळा धारण करून आत्मानुभवी होतात.

**कुटुंबमोह त्यागण्यायोग्य –**

**इहु परियण ण हु महुतणउ, इहु सुहु-दुक्खहँ हेउ।**
**इम चिंतंतहँ किं करइ, लहु संसारहँ छेउ ।।६७।।**

कुटुंब हे माझेच नसे, सुख दुःखाची खाण असे।
हे चिंतन करितो जो, तो भव विच्छेद करीत असे।।६७।।

**अन्वयार्थ : (इहु परियणु महुतणउ णहु)** हा कुटुंब परिवार वास्तविक माझा नाही **(इहु सुहु)** असा विचार ते सुखाचे कारण आहे **(दुक्खहँ हेउ)** आणि कुटुंब परिवार विषयक मोहभाव ते दुःखाचे कारण आहे **(इम किं चिंतंतहं)** अशाप्रकारचे थोडेसे चिंतन **(संसारहँ छेउ लहु करइ)** लवकरच संसाराचा नाश करील.

**सामान्यार्थ :** हा कुटुंब परिवार वास्तविक पाहता माझा नाही, असा विचार सुखाचे कारण आहे आणि कुटुंब परिवार विषयीचा मोहभाव दुःखाचे कारण आहे – अशाप्रकारचे अल्प चिंतन लवकरच संसाराचा नाश करेल.

**आत्म्याला आत्माच शरण –**

**इंद फणिंद-णरिंद य वि, जीवहँ सरणु ण होंति।**
**असरणु जाणिवि मुणि धवला, अप्पा अप्प मुणंति ।।६८।।**

इंद्र नरेंद्र फणेंद्र कुणी, जीवाचे रक्षण न करी।
जाणुनि अशरण मुनी स्वतः, स्वभावात नित रमण करी।।६८।।

**अन्वयार्थ : (इंद-फणिंद-णरिंद य वि जीवहँ सरणु ण होंति)** इंद्र, धरणेंद्र व चक्रवर्ती यांच्यापैकी कोणीही संसारी जीवांना शरण नाहीत **(धवला मुणि असरणु जाणिवि)** तसेच उत्तम मुनी देखील

आपणास कोणीही शरण नाही हे जाणून **(अप्पा अप्प मुणंति)** आपल्या आत्म्याचा स्वतः अनुभव करतात.

**सामान्यार्थ :** इंद्र, धरणेंद्र व चक्रवर्ती यांच्यापैकी कोणी देखील संसारी दुःखी जीवांना शरण/रक्षक/आधार नाहीत. तसेच उत्तम मुनी देखील आपणास कोणीही शरण नाही असे जाणून आपल्या आत्म्याचा स्वतः अनुभव करतात.

**जीव सदा एकटा –**

**इक्क उपज्जइ मरइ कु वि, दुहु सुहु भुंजइ इक्कु।**
**णरयहँ जाइ वि इक्क जिउ, तह णिव्वाणहँ इक्कु।।६९।।**

जीव जन्मतो अन् मरतो, दुख सुख भोगी जीव स्वतः।
नरक गमन करि जीव स्वतः, शिव सुख भोगी जीव स्वतः।।६९।।

**अन्वयार्थ : (इक्क उपज्जइ मरइ कु वि)** जीव एकटाच जन्मतो आणि एकटाच मरतो **(इक्कु दुहु सुहु भुंजइ)** एकटाच दुःख अथवा सुख भोगतो **(इक्क जिय णरयहँ जाइ वि)** एकटाच जीव नरकामध्ये देखील जातो **(तह इक्कु णिव्वाणहँ)** तसेच एकटाच जीव निर्वाणाला पोहोचतो.

**सामान्यार्थ :** जीव एकटाच जन्मतो आणि एकटाच मरतो. एकटाच दुःख अथवा सुख भोगतो. एकटाच जीव नरकामध्ये देखील जातो. तसेच एकटाच जीव निर्वाणाला पोहोचतो.

**ज्ञानमय आत्म्याचे ध्यान करा –**

**एक्कुलउ जइ जाइसिहि, तो परभाव चएहि।**
**अप्पा झायहि णाणमउ, लहु सिव–सुक्ख लहेहि।।७०।।**

जर जाणार एकटा तू, तर सोडुनि पर भावाला।
ज्ञान स्वरूप निजात्म्याचे, ध्यान करूनि जा मोक्षाला।।७०।।

**अन्वयार्थ : (जइ एक्कलउ जाइसिहि)** जर कुठेही तुम्हाला एकट्यालाच जावयाचे आहे **(तो परभाव चएहि)** तर राग, द्वेष, मोहादी सर्व परभावांचा त्याग करा **(णाणमउ अप्पा झायहि)** ज्ञानमय

आत्म्याचे ध्यान करा **(लहु सिव–सुक्ख लहेहि)** यामुळे लवकरच मोक्षसुखाची प्राप्ती होईल.

**सामान्यार्थ :** जर कुठेही आपणास एकट्यालाच जावयाचे आहे; तर मग राग, द्वेष, मोहादी परभावांचा त्याग करा आणि ज्ञानमय आत्म्याचे ध्यान करा. यामुळे आपण लवकरच मोक्ष सुखाची प्राप्ती कराल.

**पुण्याला पाप मानतो तो ज्ञानी –**

**जो पाउ वि सो पाउ मुणि, सव्वु इ को वि मुणेइ।**
**जो पुण्णु वि पाउ वि भणइ, सो बुह को वि हवेई ।।७१।।**

पापाला पापच म्हणती, सर्व लोक या जगतात।
पुण्याला जो पाप म्हणे, तो ज्ञानी या लोकात ।।७१।।

**अन्वयार्थ : (जो पाउ वि सो पाउ मुणि)** जे पाप आहे, त्याला पाप जाणा **(सव्वु इ को वि मुणेइ)** पापाला तर सर्वजण पापच मानतात **(जो पुण्णु वि पाउ वि भणेइ)** जो कोणी पुण्याला देखील पाप मानतो/जाणतो **(सो बुह को वि हवेइ)** असा एखादा बुद्धिमान विरळाच असतो.

**सामान्यार्थ :** जे पाप आहे, त्याला पाप जाणा. पापाला तर सर्वजण पापच मानतात. परंतु जे कोणी पुण्याला देखील पाप मानतात/ जाणतात असे बुद्धिमान विरळेच असतात.

**पुण्यकर्म सोन्याची बेडी –**

**जह लोहम्मिय णियड बुह, तह सुण्णमिय जाणि।**
**जे सुह असुह परिच्चयहि, ते वि हवंति हु णाणि ।।७२।।**

लोह सुवर्णाची बेडी, एकसारखी जो जाणी।
शुभ अशुभाला जो सोडी, तोच जगात खरा ज्ञानी।।७२।।

**अन्वयार्थ : (बुह)** हे बुद्धिमान ! **(लोहम्मिय णियड तह सुण्णम्मिय जाणि)** जशी लोखंडाची बेडी तशीच सुवर्णाची बेडी आहे असे जाणा. **(जे सुह असुह परिच्चयहि)** जे पुण्य व पाप या

दोन्ही परिणामांचा त्याग करतात **(ते वि हु णाणि हवंति)** तेच निश्चयाने (वास्तविक) ज्ञानी आहेत.

**सामान्यार्थ :** हे बुद्धिमान ! जशी लोखंडाची बेडी (बंधनकारक/ दुःखदायक) आहे, तशीच सुवर्णाची बेडी (बंधनकारक) आहे असे जाणा. जे पुण्य व पाप या दोन्ही परिणामांचा त्याग करतात, तेच निश्चयाने (वास्तविक) ज्ञानी आहेत.

**भावनिर्ग्रंथच मोक्षमार्गी –**

**जइया मणु णिग्गंथु जिय, तइया तुहुँ णिग्गंथु।**
**जइया तुहुँ णिग्गंथु जिय, तो लब्भइ सिवपंथु।।७३।।**

जर तव मन निर्ग्रंथ असे, तर तू आहे निर्ग्रंथ।
निर्ग्रंथचि होशील जेव्हा, तेव्हा मिळेल शिवपंथ।।७३।।

**अन्वयार्थ : (जिय जइया मणु णिग्गंथु)** हे जीवांनो ! जेव्हा तुमचे मन निर्ग्रंथ आहे तेव्हा तुम्ही खरे निर्ग्रंथ आहात. **(जिय जइया तुहुँ णिग्गंथु)** हे जीवांनो ! जेव्हा तुम्ही आपल्या निर्ग्रंथ स्वभावाचा स्वीकार कराल **(तो सिवपंथु लब्भइ)** तेव्हा तुम्हाला मोक्षमार्गाची प्राप्ती झाली असे जाणा.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! जर तुमचे मनच स्वभावतः निर्ग्रंथ आहे, तर तुम्ही खरे निर्ग्रंथ आहात. हे जीवांनो ! जेव्हा तुम्ही आपल्या निर्ग्रंथ स्वभावाचा स्वीकार कराल तेव्हाच तुम्हाला मोक्षमार्गाची प्राप्ती झाली असे जाणा.

**देह-देवालयामध्ये भगवान आत्मा –**

**जं वडमज्झहँ बीउ फुडु, बीयहँ वडु वि हु जाणु।**
**तं देहहँ देउ वि मुणहि, जो तइलोय पहाणु।।७४।।**

वट वृक्षातच बीज असे, बीजातच वटवृक्ष असे।
तसा देव देही जाणा, प्रधान जो जगतात असे।।७४।।

**अन्वयार्थ : (जं वडमज्झहँ बीउ फुडु)** जसे वडाच्या झाडामध्ये वडाचे बीज स्पष्टपणे व्यापक आहे **(बीयहँ वडु वि हु जाणु)** तसे

बीजामध्ये वडाच्या झाडाला पहा **(तं देहहँ देउ वि मुणहि)** त्याचप्रमाणे या शरीरामध्ये आत्मदेवाचा अनुभव करा **(जो तइलोय-पहाणु)** जो आत्मदेव तीन लोकामध्ये मुख्य आहे.

**सामान्यार्थ :** जसे वडाच्या झाडामध्ये वडाचे बीज स्पष्टपणे व्यापक आहे, तसे बीजामध्ये वडाच्या झाडाला पहा. त्याचप्रमाणे या शरीरामध्ये आत्मदेवाचा अनुभव करा, जो आत्मदेव तीन लोकामध्ये मुख्य (श्रेष्ठ, प्रधान) आहे.

**मी स्वयं जिनेंद्र –**

**जो जिण सो हउँ सो जि हउ, एहउ भाउ णिभंतु।**
**मोक्खहं कारण जोइया, अण्णु ण तंतु ण मंतु।।७५।।**

जो जिन तो तर मी आहे, हा अनुभव शिव हेतु असे।
हे योगी ! तू जाणुनि घे, अन्य मंत्र अन तंत्र नसे।।७५।।

**अन्वयार्थ : (जो जिण सो हउँ)** जो जिनेंद्र परमात्मा आहे, तोच मी आहे **(सो जि हउँ)** आणि मी आहे तोच जिनेंद्र परमात्मा आहे **(एहउ णिभंतु भाउ)** अशी नि:शंक भावना करा **(जोइया)** हे योगीश्वरांनो ! **(मोक्खहँ कारण अण्णु तंतु ण मंतु ण)** हाच मोक्षाचा उपाय आहे. अन्य कोणत्याही प्रकारे तंत्र-मंत्र आदी मोक्षाचा उपाय नाही.

**सामान्यार्थ :** जो जिनेंद्र परमात्मा आहे, तोच मी आहे आणि जो मी आहे तोच जिनेंद्र परमात्मा; अशी नि:शंक भावना करा. हे योगीश्वरांनो ! हाच मोक्षाचा उपाय आहे; अन्य तंत्र-मंत्र आदी मोक्षाचा उपाय नाही.

**आत्मगुणांचे चिंतन करा –**

**बे ते चउ पंच वि णवहँ, सत्तहँ छह पंचाहँ।**
**चउगुण सहियउ सो मुणह, एयइँ लक्खण जाण।।७६।।**

दोन तीन नव चार सहा, हे आत्म्याचे गुण जाण।
पाच सात गुण धारी हा, आत्म्याचे लक्षण जाण।।७६।।

**अन्वयार्थ : (सो)** त्या आपल्या आत्म्याला **(बे ते चउ पंच वि णवहँ, सत्तहँ छह पंचाह चउगुण सहियउ मुणह)** दोन, तीन, चार, पाच, नऊ, सात, सहा, पाच आणि चार गुणांसहित समजा **(जाण एयइँ लक्खण)** अशाप्रकारे परमात्म्याचे वा आत्म्याचे हे लक्षण/गुण आहेत; असे जाणा.

**सामान्यार्थ :** त्या आपल्या आत्म्याला दोन, तीन, चार, पाच, नऊ, सात, सहा, पाच, आणि चार गुणांसहित समजा. अशाप्रकारे परमात्म्याचे वा आत्म्याचे हे लक्षण/गुण आहेत; असे जाणा.

**भावार्थ :** दोन इत्यादी गुणांचा संक्षेपात खुलासा पुढीलप्रमाणे जाणावा –

१) **दोन** : आत्मा, गुणपर्यायवान आहे; द्रव्यपर्यायात्मक आहे अथवा आत्मा ज्ञान-दर्शनस्वभावी आहे.

२) **तीन** : आत्मा, उत्पाद-व्यय-ध्रौव्यस्वभावी आहे. आत्मा, द्रव्य-गुण-पर्यायवान आहे, अथवा आत्मा, रत्नत्रय(सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र)रूप आहे.

३) **चार** : आत्मा, अनंतचतुष्टय – दर्शन, ज्ञान, सुख व वीर्यरूप आहे.

४) **पाच** : आत्मा, औपशमिक, क्षायोपशमिक, क्षायिक, औदयिक आणि पारिणामिक या पाच असाधारण भावांनी सहित आहे. तसेच आत्मा अरहंत, सिद्ध इत्यादी पंच परमेष्ठीस्वरूप आहे.

५) **सहा** : आत्मा; पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, ऊर्ध्व, अधो अशाप्रकारे सहाही दिशांना गमन करणारा आहे. तसेच आत्मा; अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रमेयत्व, अगुरुलघुत्व आणि प्रदेशत्व या सहा प्रमुख सामान्य गुणांनी सहित आहे.

६) **सात** : आत्मा आहे म्हणूनच जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष या सप्त तत्त्वांची व्यवस्था आहे.

**७) नऊ :** आत्मा, वरील सात तत्त्व व पुण्य तथा पाप मिळून होणाऱ्या नऊ पदार्थांमध्ये स्थित आहे. आत्मा, नऊ लब्धिरूप आहे. (क्षायिक ज्ञान, दर्शन, दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्य, सम्यक्त्व, चारित्र.)

**दोन गुणांचा विचार करा –**

**बे छंडिवि बे गुण सहिउ, जो अप्पाणि वसेइ।**
**जिणु सामिउ एमइँ भणइ, लहु णिव्वाणु लहेइ ।।७७।।**

दोन सोडुनी आत्म्याच्या, द्वय गुणात जे रत होती।
ते निश्चित मोक्षा जाती, हे श्री जिनवर नित म्हणती।।७७।।

**अन्वयार्थ : (जो बे छंडिवि)** जो दोन अर्थात राग-द्वेषरूप अवगुणांचा त्याग करून **(बे गुण सहिउ अप्पाणि वसेइ)** ज्ञानदर्शन या दोन गुणधारी आत्म्यामध्ये निवास करतो **(लहु निव्वाणु लहेइ)** तो लवकरच निर्वाण पदाला/मोक्ष पदाला प्राप्त करतो. **(एमइं जिणु सामिइ भणइ)** असे जिनवर भगवंतांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** जे दोन अवगुणांचा अर्थात राग-द्वेषांचा त्याग करून ज्ञान-दर्शन या दोन गुणधारी आत्म्यामध्ये निवास करतात, ते लवकरच निर्वाण/मोक्षाला प्राप्त करतात – असे जिनवर भगवंतांनी सांगितले आहे.

**तीन गुणांचा विचार करा –**

**तिहिं रहियउ तिहिं गुण सहिउ, जो अप्पाणि वसेइ।**
**सो सासय-सुह-भायणु वि, जिणवरु एम भणेइ ।।७८।।**

तीन सोडुनी आत्म्याच्या, तीन गुणात जे रमतात।
ते शाश्वत सुख प्राप्त करी, हे श्री जिनवर म्हणतात।।७८।।

**अन्वयार्थ : (तिहिं रहियउ)** तीन अर्थात राग, द्वेष, मोहाने रहित होऊन **(तिहिं गुण सहिउ अप्पाणि जो वसइ)** तीन गुण अर्थात सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र सहित आत्म्यामध्ये जो निवास

करतो **(तो सासय-सुहु भायणु वि)** तो अविनाशी सुखाचा भाजन/पात्र होतो **(जिणवरु एम भणेइ)** असे जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** तीन अर्थात राग, द्वेष, मोहाने रहित होऊन तीन गुण अर्थात सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्‌चारित्र सहित आत्म्यामध्ये जे निवास करतात, ते अविनाशी सुखाचे भाजन/पात्र होतात; असे जिनेंद्रदेवांनी सांगिले आहे.

**चार गुणांचा विचार करा –**

**चउ कसाय सण्णा रहिउ, चउ गुण सहियउ वुत्तु।**
**सो अप्पा मुणि जीव तुहुँ, जिम परु होहि पवित्तु।।७९।।**

कषाय संज्ञा चार विणा, चार गुणांच्या आत्म्यात।
लीन होउनी जीवा तू, पावन होशील जगतात।।७९।।

**अन्वयार्थ : (कसाय चउ)** आत्मा क्रोधादी चार कषाय **(सण्णा)** तसेच आहार, भय, मैथुन आणि परिग्रह या चार संज्ञांनी रहित आहे. **(अप्पा चउु गुण सहिउ, वुत्तु)** आत्मा दर्शन, ज्ञान, सुख व वीर्य गुणांनी सहित सांगितला गेला आहे **(जीव तुहुँ सो मुणि)** हे जीवांनो ! आत्म्याचे आपण असे सतत मनन-चिंतन करा. **(जिम परु पवित्तु होहि)** यामुळे तुम्ही परम पवित्र व्हाल.

**सामान्यार्थ :** आत्मा क्रोधादी चार कषाय तसेच आहार, भय, मैथुन व परिग्रह संज्ञांनी रहित आहे आणि आत्मा दर्शन, ज्ञान, सुख व वीर्य या चार गुणांनी सहित सांगितला गेला आहे. हे जीवांनो ! आत्म्याचे असे सतत मनन-चिंतन करा. यामुळे आपण परम-पवित्र व्हाल.

**दहा गुण सहित आत्म्याचे ध्यान करा –**

**बे-पंचहँ रहियउ मुणहि, बे-पंचहँ संजुत्तु।**
**बे-पंचहँ जो गुणसहिउ, सो अप्पा णिरुवुत्तु।।८०।।**

रहित दहा अन सहित दहा, दशगुणधारी जो आत्मा।
त्याचे चिंतन मनन करा, ज्ञाता दृष्टा जो आत्मा।।८०।।

**अन्वयार्थ : (बे पंचहँ रहियउ)** दोन प्रकारच्या पाचांनी रहित अर्थात पाच इंद्रिय विषयांचा त्याग करून व पाच प्रकारच्या अव्रतरूप पापांचा देखील त्याग करून **(बे पंचहँ संजत्तु मुणहि)** दोन प्रकारच्या पाचांनी सहित अर्थात पाच इंद्रिय दमनरूप संयम व पाच महाव्रत सहित होऊन आपल्या आत्म-स्वभावाचे मनन करावे **(जो बे-पंचहँ गुणसहिउ सो अप्पा णिरुवुत्तु)** अशाप्रकारे उत्तम क्षमादी दहा धर्मसहित जे आहेत, तेच वास्तविक आत्मा आहेत; असे सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** दोन प्रकारच्या पंचकांनी रहित अर्थात पाच इंद्रिय विषयांचा व पाच प्रकारच्या अव्रतरूप पापांचा देखील त्याग करून दोन प्रकारच्या पंचकांनी सहित अर्थात पाच इंद्रिय दमनरूप संयम व पाच महाव्रत सहित होऊन आपल्या आत्म-स्वभावाचे मनन करावे. अशाप्रकारे उत्तम क्षमादी दहा धर्मसहित जे आहेत, तेच वास्तविक आत्मा आहेत; असे सांगितले आहे.

**आत्माच सम्यग्दर्शनादी आहे –**

**अप्पा दंसणु णाणु मुणि, अप्पा चरणु वियाणि।**
**अप्पा संजमु सील तउ, अप्पा पच्चक्खाणि ।।८१।।**

दर्शन ज्ञान असे आत्मा, अन चारित्र असे आत्मा।
व्रत तप संयम हा आत्मा, प्रत्याख्यान असे आत्मा।।८१।।

**अन्वयार्थ : (अप्पा दंसणु णाणु मुणि)** आत्माच सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान आहे असे जाणा **(अप्पा चरणु वियाणि)** आत्माच सम्यक्चारित्र आहे असे समजा **(अप्पा पच्चक्खाणि)** आत्माच प्रत्याख्यान आहे.

**सामान्यार्थ :** आत्माच सम्यग्दर्शन व सम्यग्ज्ञान आहे, असे जाणा व आत्माच सम्यक्चारित्र आहे, असे समजा. आत्माच संयम, शील, तप आहे आणि आत्माच प्रत्याख्यान आहे.

**भावार्थ :** येथे आत्मरमणतारूप पर्यायाला आत्मद्रव्य समजून कथन

केले आहे. म्हणून जेथे-जेथे आत्मा शब्द आला आहे, तेथे-तेथे आत्मरमणता असा अर्थ समजून घ्यावयास हवा. अर्थात आत्मरमणतारूप वीतराग अवस्थेला सम्यग्दर्शन इत्यादी नावांनी येथे संबोधिले आहे. जिनशास्त्राचा अर्थ करीत असतांना वक्त्याचा व ग्रंथकर्त्याचा अभिप्राय समजून घेतल्यामुळे शास्त्राचा यथार्थ अर्थ समजून येतो व आपल्या जीवनात धर्म प्रगट करण्यासाठी पुरुषार्थाला अवकाश मिळतो; जीवन धर्ममय बनते आणि आनंद/सुख प्रगट होते.

**परभावाचा त्यागच संन्यास –**

**जो परियाणइ अप्प परु, सो परु चयइ णिभंतु।**
**सो सण्णासु मुणेहि तुहुँ, केवल-णाणिं उत्तु ।।८२।।**

स्व-पर भाव जो जाणतसे, तो परभावा सोडतसे।
जाण हाच संन्यास असे, केवलज्ञानी म्हणत असे ।।८२।।

**अन्वयार्थ : (जो अप्प परु परियाणइ)** जो जीव आपल्या आत्म्याला व परद्रव्याला जाणतो **(सो णिभंतु परु चयइ)** तो भ्रांतिरहित होऊन/नि:शंक रीतीने परभावाचा त्याग करतो **(तुहुँ सो सण्णासु मुणेहि)** तुम्ही त्यालाच संन्यास/त्याग जाणा **(केवलणाणी उत्तु)** असे केवली भगवंतांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** "जो जीव आपल्या आत्म्याला व परद्रव्याला जाणतो, तो भ्रांतिरहित होऊन नि:शंक रीतीने परभावाचा त्याग करतो, आपण त्यालाच संन्यास/त्याग जाणा-" असे केवली भगवंतांनी सांगितले आहे.

**रत्नत्रय धर्मच उत्तम तीर्थ –**

**रयणत्तय-संजुत्त जिउ, उत्तिमु तित्थु पवित्तु।**
**मोक्खहँ कारण जोइया, अण्णु ण तंतु ण मंतु ।।८३।।**

रत्नत्रयमय जीव सदा, उत्तम पावन तीर्थ असे।
हे योगी ! शिव साधन हे, अन्य न मंत्र न तंत्र असे ।।८३।।

**अन्वयार्थ : (जोइया)** हे योगी ! **(रणत्तय-संजुत्त जिउ उत्तिमु पवित्तु तित्थु)** रत्नत्रयसहित जीव उत्तम व पवित्र तीर्थ आहे **(मोक्खहँ कारण)** हेच मोक्षाचे कारण/साधन आहे. **(अण्णु तंतु ण मंतु ण)** आणि अन्य तंत्र वा मंत्र मोक्षाचे कारण नाही.

**सामान्यार्थ :** हे योगी ! रत्नत्रयसहित जीव उत्तम व पवित्र तीर्थ आहे. हेच मोक्षाचे कारण/साधन आहे. अन्य काहीही तंत्र व मंत्र मोक्षाचे कारण नाही.

**रत्नत्रयाचे स्वरूप –**

**दंसणु जं पिच्छियइ बुह, अप्पा विमल महंतु।**
**पुणु पुणु अप्पा भावियए, सो चारित्त पवित्तु ।।८४।।**

निर्मल श्रद्धा दर्शन हे, निर्मल ज्ञान खरे ज्ञान।
निर्मल आत्मभावना तू, हे चारित्र खरे जाण ।।८४।।

**अन्वयार्थ : (अप्पा विमल महंतु)** आपला आत्मा मलरहित शुद्ध व महान परमात्मा आहे **(जं पिच्छियए दंसणु, (जं णाणइ) (बुह)** असे जे पाहणे/श्रद्धान करणे हेच सम्यग्दर्शन व जाणणे हेच सम्यग्ज्ञान आहे. **(पुणु पुणु अप्पा भावियए पवित्तु चारित्तु)** वारंवार निज शुद्धात्म्याची भावना करणे हे पवित्र चारित्र आहे.

**सामान्यार्थ :** आपला आत्मा मलरहित/शुद्ध व महान परमात्मा आहे; असे जे पाहणे/श्रद्धान करणे, तेच सम्यग्दर्शन आहे. तसेच जाणणे हे सम्यग्ज्ञान आहे आणि वारंवार निज शुद्धात्म्याची भावना/ध्यान करणे, हे पवित्र चारित्र आहे.

**जेथे आत्मा तेथे त्याचे सर्व गुण –**

**जहिं अप्पा तहिं सयल गुण, केवलि एम भणंति।**
**तिहिं कारणएँ जोइ फुडु, अप्पा विमलु मुणंति ।।८५।।**

केवळ आत्मा एक सदा, सर्व गुणांचा पिंड असे।
योगी अनुभव घेत असे, केवली भगवन म्हणत असे ।।८५।।

**अन्वयार्थ : (जहिं अप्पा तहिं सयल गुण)** जेथे आत्मा असतो, तेथे त्याचे सकल गुण असतात **(एम केवलि भणंति)** अशाप्रकारे केवली भगवान सांगतात **(तिहिं कारणएँ जोइ फुडु विमलु अप्पा मुणंति)** याच कारणामुळे योगीश्वर निर्मल आणि स्पष्ट आत्म्याचा अनुभव करतात.

**सामान्यार्थ :** "जेथे आत्मा असतो तेथे त्याचे सकल गुण असतात" – अशाप्रकारे केवली भगवंतांनी सांगितले आहे. याच कारणामुळे योगीश्वर स्पष्ट व निर्मल अशा आपल्या आत्म्याचा अनुभव करतात.

**भावार्थ :** या दोह्यामध्ये द्रव्य व गुणांची भेद अपेक्षा गौण केली आहे. जसे प्रकाश व प्रतापवान सूर्याला ग्रहण केले असता त्याची किरणे आपोआपच ग्रहण केली जातात. तसे आत्म्याला स्वीकारले असता त्याच्या गुण व पर्यायांना ग्रहण केल्यासारखे होते; म्हणून योगीश्वर निज आत्म्यालाच ग्रहण करतात.

**एका आत्म्याचाच स्वीकार करा –**

**एक्कलउ इंदिय रहियउ मण, वय काय ति सुद्धि।**
**अप्पा अप्पु मुणेहि तुहुँ, लहु पावहि सिवसिद्धि।।८६।।**

विषय–वासना दूर करा, मन वच तन अति शुद्ध करा।
निज आत्म्याचे मनन करा, सत्वर शिव सुख प्राप्त करा।।८६।।

**अन्वयार्थ : (एक्कलउ)** एकाकी अर्थात निर्ग्रंथ बनून **(इंदिय रहियउ)** पाच इंद्रियांच्या विषयांपासून विरक्त होऊन **(मण वय काय ति सुद्धि)** मन–वचन–कायेच्या शुद्धिपूर्वक **(तुहुं अप्पा अप्पु मुणेहि)** तुम्ही आपल्या आत्म्याचा आपल्या आत्म्याद्वारे स्वीकार/मनन/श्रद्धान करा **(सिव सिद्धि लहु पावहि)** मोक्षाची सिद्धी लवकरच प्राप्त कराल.

**सामान्यार्थ :** एकाकी अर्थात निर्ग्रंथ/दिगंबर बनून पाच

इंद्रियांच्या विषयापासून विरक्त होऊन मन-वचन-कायेच्या शुद्धीपूर्वक तुम्ही आपल्या आत्म्याचा आपल्याच आत्म्याद्वारे स्वीकार/मनन/श्रद्धान/ध्यान करा; यामुळे मोक्षाची सिद्धी लवकरच प्राप्त होईल.

**सहजात्मस्वरूपामध्ये रमण करा –**

**जइ बद्धउ मुक्कउ मुणहि, तो बंधियहि णिभंतु।**
**सहज-सरूवइ जइ रमहि, तो पावहि सिव संतु।।८७।।**

बंध मोक्ष कल्पना सदा, बंधाचे कारण आहे।
सहजस्वरूपी रमणे हे, मोक्षाचे कारण आहे।।८७।।

**अन्वयार्थ : (जइ बद्धउ मुक्कउ मुणहि)** जर तुम्ही आत्मा बद्ध आहे, मुक्त आहे अशी मान्यता /कल्पना कराल **(तो णिभंतु बंधियहि)** तर तुम्ही नि:संदेह बद्ध व्हाल **(जइ सहज सरूवइ रमहि)** जर तुम्ही अनादीअनंत आत्म्याच्या सहज/स्वाभाविक स्वरूपात रममाण व्हाल **(तो संतु सिव पावहि)** तर तुम्ही शांतस्वरूप मोक्षावस्था प्राप्त कराल.

**सामान्यार्थ :** जर तुम्ही "आत्मा बद्ध आहे, मुक्त आहे" – अशी मान्यता/कल्पना कराल तर तुम्ही नि:संदेह बद्ध व्हाल. जर तुम्ही अनादीअनंत आत्म्याच्या सहज/स्वभाविक स्वरूपामध्ये रममाण व्हाल तर तुम्ही शांतस्वरूप मोक्षावस्था प्राप्त कराल.

**सम्यग्दृष्टी जीवाचे सुगतिमध्ये गमन –**

**सम्माइट्ठी जीवडहँ, दुग्गइ-गमणु ण होइ।**
**जइ जाइ वि तो दोसु णवि, पुव्वक्किउ खवणेइ।।८८।।**

सम्यग्दृष्टी जीवाचे, दुर्गतीत कधि गमन नसे।
गेला तर तो दोष नसे, पूर्व कर्म क्षय होत असे।।८८।।

**अन्वयार्थ : (सम्माइट्ठी जीवडहँ दुग्गइगमणु ण होइ)** सम्यग्दृष्टी जीवाचे दुर्गतिमध्ये गमन होत नाही **(जइ जाइ वि तो दोसु ण वि)** जरी कदाचित खोट्या/दुर्गतिमध्ये गमन झाले तरी हानी/नुकसान/बिघाड नाही **(पुव्वक्किउ खवणेइ)** कारण तो पूर्वकृत कर्मांचा क्षय करतो.

**सामान्यार्थ :** सम्यग्दृष्टी जीवाचे गमन दुर्गतिमध्ये अर्थात नरक-तिर्यंच गतिमध्ये होत नाही. जरी कदाचित दुर्गतिमध्ये गमन झाले तरी देखील हानी/नुकसान/बिघाड होत नाही. कारण तो पूर्वकृत कर्माचा क्षय करतो.

**भावार्थ :** सम्यग्दर्शन प्राप्त करण्याच्या अगोदर आयुकर्माचा बंध झाला असल्यास सम्यग्दृष्टी जीवाचे गमन दुर्गतिमध्ये होऊ शकते. जसे श्रेणिक राजाचे गमन नरकामध्ये झाले आहे.

**सम्यग्दृष्टीचे सर्वोत्कृष्ट कर्तव्य –**

**अप्प–सरूवइँ जो रमइ, छंडिवि सहु ववहारु।**
**सो सम्माइट्ठी हवइ, लहु पावइ भवपारु॥८९॥**

निजरूपी जो नित रमतो, सोडुनि सारा व्यवहार।
सम्यग्दृष्टी आत्मा तो, लवकर जातो भवपार॥८९॥

**अन्वयार्थ : (जो सहु ववहारू छंडिवि)** जो सर्व व्यवहाराचा त्याग करून **(अप्प–सरूवहँ रमइ)** आपल्या आत्म–स्वरूपामध्ये रममाण होतो **(सो सम्माइट्टी हवइ)** तो सम्यग्दृष्टी जीव होय **(लहु पावइ भवपारू)** असा सम्यग्दृष्टी लवकरच संसाराचा किनारा/मोक्ष प्राप्त करतो.

**सामान्यार्थ :** जो सर्व व्यवहाराचा त्याग करून आपल्या आत्म-स्वरूपामध्ये रममाण होतो, तो सम्यग्दृष्टी होय. असा सम्यग्दृष्टी जीव लवकरच संसाराचा किनारा/मोक्ष प्राप्त करतो.

**भावार्थ :** जेव्हा साधक शुद्धोपयोगामध्ये मग्न होतो, तेव्हा सर्व व्यवहाराचा त्याग होतो. अध्यात्म ग्रंथामध्ये सम्यग्दृष्टीचा अर्थ मात्र चतुर्थ गुणस्थानवर्ती सम्यग्दृष्टी करावयास नको. तेथे सम्यग्दृष्टीचा अर्थ शुद्धोपयोगमग्न मुनिमहाराज असा करावयास हवा.

**सम्यग्दृष्टीच बुद्धिमान व प्रधान –**

**जो समत्त पहाण बुहु, सो तइलोय पहाणु।**
**केवल–णाण वि लहु लहइ, सासय सुक्ख णिहाणु॥९०॥**

सम्यक्त्वाचा जो स्वामी, तो प्रधान जगी विद्वान।
अक्षय सुखमय सत्वर तो, प्राप्त करी केवलज्ञान॥९०॥

**अन्वयार्थ : (जो समत्त-पहाण)** जो सम्यक्त्वप्रधानी आहे अर्थात ज्याच्या जीवनात सम्यक्त्व प्रधान/मुख्य/सर्वस्व आहे **(सो बुहु तइलोय-पहाणु)** तो बुद्धिमान असून तीन लोकामध्ये प्रधान आहे **(सासय सुक्ख णिहाणु केवलणाण वि लहु लहइ)** तो अविनाशी सुखाचे निधानस्वरूप केवलज्ञानाला लवकरच प्राप्त करतो.

**सामान्यार्थ :** जो सम्यक्त्व प्रधानी आहे अर्थात ज्याच्या जीवनात सम्यक्त्व प्रधान/मुख्य/सर्वस्व आहे, तो बुद्धिमान असून तीन लोकामध्ये प्रधान आहे. तो अविनाशी सुखाचे निधानस्वरूप केवलज्ञानाला लवकरच प्राप्त करतो.

**भावार्थ :** तीन लोकातील सर्व संपदेच्या प्राप्तीपेक्षा सम्यग्दर्शनाची प्राप्ती महत्त्वाची आहे. सम्यग्दर्शनसहित चांडाळ पुरुष देखील पूजनीय आहे; परंतु सम्यक्त्वरहित नवव्या ग्रैवेयकामधील अहमिंद्रदेव देखील पूजनीय नाही. मिथ्यादृष्टी दिगंबर साधुपेक्षा सम्यग्दर्शनसहित गृहस्थ श्रेष्ठ आहे. सम्यग्दर्शन सहित नरकवास उत्तम; परंतु सम्यग्दर्शनरहित स्वर्गवास चांगला नव्हे.

**आत्मस्थिरताच संवर व निर्जरेचे कारण –**

**अजरु अमरु गुण गण णिलउ, जहिं अप्पा थिरु ठाइ।**
**सो कम्मेहिं ण बंधियउ, संचिय पुव्व विलाइ ।।९१।।**

अजर अमर गुणमय आत्मा, जेव्हा आत्म्यातच रमतो।
नव कर्मांचा बंध नसे, पूर्व कर्म तो क्षय करतो ।।९१।।

**अन्वयार्थ : (जहिं अजरु अमरु गुण-गण-णिलउ अप्पा थिरु ठाइ)** जेथे/जेव्हा अजर, अमर, गुणांचा समुदायरूप आत्म्यामध्ये स्थिरता होते **(सो कम्मेहिं ण बांधियउ)** तेव्हा तो नवीन कर्मांनी बद्ध होत नाही अर्थात संवर होतो **(पुव्व संचिय विलाइ)** आणि पूर्वसंचित कर्मांचा विलय/क्षय/नाश करतो.

**सामान्यार्थ :** जेव्हा अजर, अमर गुणसमुदायरूप आत्म्यामध्ये

स्थिरता होते तेव्हा स्थिरताप्राप्त असा तो आत्मा नवीन कर्मांनी बद्ध होत नाही अर्थात संवर होतो आणि पूर्वसंचित कर्मांचा नाश होतो.

**आत्मस्वभावामध्ये लीन जीव कर्मबंधरहित –**

**जह सलिलेण ण लिप्पियइ, कमलणिपत्त कया वि।**
**तह कम्मेहिं ण लिप्पियइ, जइ रइ अप्प सहावि।।९२।।**

आत्मलीन त्या जीवाला, कर्म बंध कधि होत नसे।
पाण्यातिल त्या कमळाला, पाणी स्पर्श न करी जसे।।९२।।

**अन्वयार्थ : (जह कमलणि–पत्त कया वि सलिलेण ण लिप्पियइ)** जसे कमलपत्र कधी देखील पाण्याने लिप्त/स्पर्शित होत नाही **(तह जइ अप्प–सहावि रइ कम्मेहिं ण लिप्पियइ)** तसेच आत्म-स्वभावामध्ये रत/मग्न जीव कर्मांनी लिप्त/बद्ध होत नाही.

**सामान्यार्थ :** जसे कमलपत्र कधीही पाण्याने लिप्त/स्पर्शित होत नाही, तसेच आत्मस्वभावामध्ये रत/मग्न जीव कर्मांनी लिप्त/बद्ध होत नाही.

**समसुखभोगी निर्वाणासाठी पात्र –**

**जो सम सुक्ख णिलीणु बुहु, पुण पुण अप्पु मुणेइ।**
**कम्मक्खउ करि सो वि फुडु, लहु णिव्वाणु लहेइ।।९३।।**

समसुख भोगी जो आत्मा, पुनः पुनः निज रस घेतो।
कर्मांचा क्षय करूनि तो, सत्वर मोक्षाला जातो।।९३।।

**अन्वयार्थ : (जो सम–सुक्ख णिलीणु पुण पुण अप्पु मुणेइ)** जो जीव समतारूपी सुखामध्ये लीन होऊन वारंवार आत्म्याचा अनुभव करतो **(सो वि फुडु कम्मक्खउ करि लहु णिवाणु लहेइ)** तो प्रगटपणे कर्मांचा क्षय करून लवकरच निर्वाण प्राप्त करतो.

**सामान्यार्थ :** जो जीव समतारूपी सुखामध्ये लीन होऊन वारंवार आत्म्याचा अनुभव करतो, तो प्रगटपणे कर्मांचा क्षय करून लवकरच निर्वाण प्राप्त करतो.

**आत्म्याला पुरुषाकार तथा पवित्र जाणा –**

**पुरिसायार पमाणु जिय, अप्पा एहु पवित्तु।**
**जोइज्जइ गुण–गण–णिलउ, णिम्मल–तेय–फुरंतु।।९४।।**

जीवा ! निज आत्म्यास पहा, जो अनंत गुण खाण असे।
पवित्र तेज–पुंज असे, पुरुषाकार प्रमाण असे।।९४।।

**अन्वयार्थ : (जिय)** हे जीवांनो ! **(एहु अप्पा पुरिसायार–पमाणु पवित्तु गुण–गण णिलउ णिम्मलतेय फुरंतु जोईज्जइ)** या आपल्या आत्म्याला पुरुषाकार प्रमाण, पवित्र, गुणांची खाण, निर्मल तेजाने प्रकाशमान असे पहावयास हवे.

**सामान्यार्थ :** हे जीवांनो ! या आपल्या आत्म्याला पुरुषाकार प्रमाण, पवित्र गुणांची खाण, निर्मल तेजाने प्रकाशमान असे पहावयास हवे.

**आत्मज्ञानीच सर्व शास्त्रांचा ज्ञाता –**

**जो अप्पा सुद्धु वि मुणइ, असुइ–सरीर–विभिन्नु।**
**सो जाणइ सत्थइँ सयल, सासय सुक्खहँ लीणु।।९५।।**

जो जाणी शुद्धात्म्याला, मलिन शरीराहुनि भिन्न।
तो संपूर्ण शास्त्र ज्ञाता, अविनाशी निज सुखलीन।।९५।।

**अन्वयार्थ : (जो असुइ सरीर विभिन्नु)** जो जीव या अपवित्र शरीरापासून भिन्न **(सासय सुक्खहँ लीणु)** अविनाशी सुखामध्ये लीन/सुखमय **(सुद्धु वि अप्पा मुणइ)** अशा शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो **(सो सयल सत्थइँ जाणइ)** तोच सकल शास्त्रांचा ज्ञाता आहे.

**सामान्यार्थ :** जो जीव या अपवित्र शरीरापासून भिन्न, अविनाशी सुखामध्ये लीन/सुखमय अशा शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो, तोच सकल शास्त्रांचा ज्ञाता आहे.

**भेदज्ञानसहित त्याग कार्यकारी –**

**जो णवि जाणइ अप्पु परु, णवि परभाउ चएइ।**
**सो जाणउ सत्थइँ सयल, ण हु सिवसुक्खु लहेइ।।१६।।**

स्वपर भाव जो जाणुनिया, त्याग न करि परभावांचा।
सकल शास्त्र ज्ञाता असुनी, तो नच स्वामी मोक्षाचा।।१६।।

**अन्वयार्थ : (जो अप्पु परु णवि जाणइ)** जो जीव स्वतःला आणि पराला जाणत नाही **(परभाउ णवि चएवि)** आणि परभावांचा त्याग करीत नाही **(सो सयल सत्थइँ जाणइ)** तो सकल शास्त्रांना जाणत असला तरी देखील **(सिव सुक्खु ण हु लहेइ)** शिव/मोक्ष सुखाला प्राप्त करीत नाही.

**सामान्यार्थ :** जो जीव स्व आणि पराचा भेद जाणत नाही आणि परभावांचा त्याग करीत नाही, तो सकल शास्त्रांना जाणत असला तरी देखील शिव/मोक्ष सुखाला प्राप्त करीत नाही.

**परमसमाधी मोक्ष-सुखाला कारण –**

**वज्जिय सयल वियप्पइँ, परम-समाहि लहंति।**
**जं विंदहिं साणंदु क वि, सो सिव-सुक्ख भणंति।।१७।।**

सोडुनि सर्व विकल्पांना, परम समाधी जो घेतो।
तेव्हा जो आनंद मिळे, त्याला शिवसुख जिन म्हणतो।।१७।।

**अन्वयार्थ : (सयल वियप्पइँ वज्जिय)** सर्व विकल्पांचा त्याग करून **(परम समाहि लहंति)** जीव जेव्हा परम समाधीला प्राप्त होतो **(जं क वि साणंदु विंदहिं)** तेव्हा तो विशिष्ट आनंदाचा अनुभव करतो **(सो सिव-सुक्ख भणंति)** त्यालाच शिवसुख म्हणतात.

**सामान्यार्थ :** सर्व विकल्पांचा त्याग करून जीव जेव्हा परमसमाधीला प्राप्त करतो/होतो, तेव्हा तो विशिष्ट आनंदाचा अनुभव करतो; त्यालाच शिवसुख म्हणतात.

**आत्मध्यानाचे चार प्रकार –**

**जो पिंडत्थु पयत्थु बुहु, रूवत्थु वि जिण–उत्तु।**
**रूवातीतु मुणेहि लहु, जिम परु होहि पवित्तु।।९८।।**

हे पिंडस्थ पदस्थ सदा, रूपस्थचि रूपातीत।
ध्यान करूनि तू पवित्र हो, हे बुध ! हे वच जिन कथित।।९८।।

**अन्वयार्थ :** **(बुहु)** हे बुद्धिमान ! **(जिण–उत्तु जो पिंडत्थु पयत्थु रूवत्थु रूवातीतु मुणेहि)** जिनेंद्र कथित जे पिंडस्थ, पदस्थ, रूपस्थ आणि रूपातीत ध्यान आहेत, त्यांचे मनन करा **(जिम लहु परु पवित्तु होहि)** ज्यायोगे तुम्ही परम पवित्र व्हाल.

**सामान्यार्थ :** हे बुद्धिमान ! जिनेंद्र कथित जे पिंडस्थ, पदस्थ, रूपस्थ आणि रूपातीत असे ध्यानाचे प्रकार आहेत, त्यांचे मनन करा, ज्यायोगे तुम्ही परम पवित्र व्हाल.

**सामायिक चारित्र –**

**सव्वे जीवा णाणमया, जो सम भाव मुणेइ।**
**सो सामाइउ जाणि फुडु, जिणवर एम भणेइ।।९९।।**

सर्व जीव हे ज्ञानमयी, स्वभावचि जो धारी।
तो सामायिक प्रगट करी, श्री जिनवर हे कथन करी।।९९।।

**अन्वयार्थ :** **(सव्वे जीवा णाणमया)** सर्वच जीव ज्ञानमय आहेत **(जो समभाव मुणेइ)** अशा समभावाचा जो स्वीकार करतो **(सो फुडु सामाइउ जाणि)** तो समभावच सामायिक आहे, असे स्पष्ट जाणा; असे श्री जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** "सर्वच जीव ज्ञानमय आहेत, अशा समभावाचा स्वीकारच सामायिक आहे, असे स्पष्ट जाणा;" अशाप्रकारे श्री जिनेंद्रदेवांनी सांगितले आहे.

**समभावच सामायिक –**

**राग–रोस बे परिहरिवि, जो समभाउ मुणेइ।**
**सो सामाइउ जाणि फुडु, केवलि एम भणेइ।।१००।।**

रागद्वेष जो सोडुनिया, समता भाव ग्रहण करितो।
ते सामायिक तो करितो, श्री जिनदेव सदा म्हणतो।।१००।।

**अन्वयार्थ : (जे राग रोस बे परिहरिवि समभाउ मुणेइ)** राग–द्वेष या दोन्ही परिणामांचा त्याग केल्याने जो समभाव होतो **(सो फुडु सामाइउ जाणि)** तेच वास्तविक सामायिक आहे **(एम केवलि भणेइ)** असे केवली भगवंतांनी सांगितले आहे.

**सामान्यार्थ :** ''राग–द्वेष या दोन्ही परिणामांचा त्याग केल्याने जो समभाव होतो, तेच वास्तविक सामायिक आहे''– असे केवली भगवंतांनी सांगितले आहे.

**छेदोपस्थापना चारित्र –**

**हिंसादिउ–परिहारु करि, जो अप्पा हु हवेइ।**
**सो बियउ चारित्तु मुणि, जो पंचम–गइ णेइ।।१०१।।**

हिंसादिक सोडुनिया जो, स्थिर होतो निज आत्म्यात।
छेदोपस्थापना तया नित, नेते पंचम गतित।।१०१।।

**अन्वयार्थ : (जो हिंसादिउ परिहारु करि अप्पा हु हवेइ)** जे कोणी हिंसादिक पाच पापांचा/परिहार/त्याग करून आत्म्यात स्थिर होतात **(सो बियउ चारित्तु मुणि)** त्यांचे ते द्वितीय/छेदोपस्थापना नामक चारित्र आहे, असे जाणा **(जो पंचम–गइ णेइ)** ते चारित्र जीवास पंचमगतीला पोहोचविते.

**सामान्यार्थ :** जे कोणी हिंसादिक पाच पापांचा परिहार/त्याग करून आत्म्यात स्थिर होतात, त्यांचे ते द्वितीय/छेदोपस्थापना नामक चारित्र आहे; असे जाणावयास हवे, कारण ते चारित्र जीवांस पंचमगतीला पोहोचविते.

**परिहारविशुद्धी चारित्र –**

**मिच्छादिउ जो परिहरणु, सम्मदंसण–सुद्धि।**
**सो परिहार–विसुद्धि मुणि, लहु पावइ सिव–सिद्धि।।१०२।।**

मिथ्यात्वादिक सोडुनिया, होते सद्दर्शन शुद्धी।
हे परिहार विशुद्धी जे, देई सत्वर शिवसिद्धी।।१०२।।

**अन्वयार्थ : (मिच्छादिउ परिहरणु)** मिथ्यादर्शनादिकाच्या परिहार/त्यागपूर्वक **(जो सम्मदंसण–सुद्धि)** जी सम्यग्दर्शनाची शुद्धी प्रगट होते **(सो परिहार विशुद्धी मुणि)** त्याला परिहारविशुद्धी संयम जाणा **(लहु सिव सिद्धि पावहि)** यामुळे लवकरच मोक्षपदाची सिद्धी होते.

**सामान्यार्थ :** मिथ्यादर्शनादिकाच्या परिहार/त्यागपूर्वक सम्यग्दर्शनाची जी शुद्धी प्रगट होते, त्याला परिहारविशुद्धी संयम जाणा; कारण यामुळे लवकरच मोक्षसिद्धी होते.

**भावार्थ :** जो मनुष्य तीस वर्षापर्यंत सुखपूर्वक गृहस्थअवस्थेत काळ व्यतीत करतो. नंतर दीक्षा घेऊन तीर्थंकरांच्या सान्निध्यात प्रत्याख्यानपूर्वाचा अभ्यास करतो. असे साधु विशेष रीतीने हिंसेचे त्यागी असतात. त्यांचे गुणस्थान सहावे सातवेच असते. अशा मुनींना परिहारविशुद्धी संयम होत असतो. येथे अध्यात्माच्या मुख्यतेने कथन केले आहे.

**यथाख्यात चारित्र –**

**सुहुमहँ लोहहँ जो विलउ, सो सुहुमु वि परिणामु।**
**सो सुहुमु वि चारित्त मुणि, सो सासय–सुह–धामु।।१०३।।**

सूक्ष्मलोभ नाशाने जो, होइ वीतराग भाव।
यथाख्यात संयम ते जे, आहे शाश्वत सुख ठाव।।१०३।।

**अन्वयार्थ : (सुहमहँ लोहहँ जो विलउ)** सूक्ष्म लोभाचा देखील क्षय/नाश झाल्यामुळे **(जो सुहुमु वि परिणामु)** जो विशेष/पूर्ण वीतराग

भाव होतो **(सो सुहुमु वि चारित्त मुणि)** त्याला पूर्ण/यथाख्यात चारित्र जाणा **(सो सासय-सुह-धामु)** हेच शाश्वत सुखाचे स्थान आहे.

**सामान्यार्थ :** सूक्ष्म लोभाचा देखील क्षय झाल्यामुळे जो वीतराग भाव प्रगट होतो, त्याला यथाख्यात चारित्र जाणा. हेच शाश्वत सुखाचे स्थान आहे.

**आत्माच पंचपरमेष्ठी आहे –**

**अरहंतु वि सो सिद्धु फुडु, सो आयरिउ वियाणि।**
**सो उवझायउ सो जि मुणि, णिच्छइँ अप्पा जाणि ।।१०४।।**

आत्मा श्री अरहंत असे, सिद्ध देव आचार्य असे।
उपाध्याय आत्माच असे, आत्मा निश्चय साधु असे।।१०४।।

**अन्वयार्थ : (णिच्छइँ)** निश्चयनयाने **(अप्पा वि अरहंतु जाणि)** आत्माच अरहंत आहे असे जाणा **(सो फुडु सिद्धु)** आत्माच प्रगटपणे सिद्ध आहे **(सो आयरिउ वियाणि)** आत्म्यालाच आचार्य जाणा **(सो उवझाउ)** तोच उपाध्याय आहे **(सो जि मुणि)** आणि तोच आत्मा साधु आहे.

**सामान्यार्थ :** निश्चयनयाने आत्माच अरहंत आहे – असे जाणा. तोच प्रगटपणे सिद्ध आहे. त्यालाच आचार्य जाणा, तोच उपाध्याय आहे आणि तोच आत्मा साधू आहे.

**आत्माच ब्रह्मा, विष्णु, महेशादी –**

**सो सिउ संकरु विण्हु सो, सो रुद्धु वि सो बुद्धु।**
**सो जिणु ईसरु बंभु सो, सो अणंतु सो सिद्धु।।१०५।।**

आत्मा शिवशंकर आहे, सिद्ध बुद्ध विष्णु आहे।
श्री जिन ब्रह्म रूद्र आहे, तो अनंत ईश्वर आहे।।१०५।।

**अन्वयार्थ : (सो सिउ संकरु विण्हु सो)** तो आत्माच शिव, शंकर आणि विष्णु आहे **(सो रुद्धु वि सो बुद्धु)** तोच रुद्र आणि बुद्ध

आहे **(सो जिणु ईसरु बंभु सो)** तोच जिन, ईश्वर आणि ब्रह्मा आहे. **(सो अणंतु सो सिद्धु)** आणि तोच आत्मा अनंत व सिद्ध आहे.

**सामान्यार्थ :** तो आत्माच शिव, शंकर आणि विष्णु आहे. तोच रुद्र व बुद्ध आहे. तोच जिन, ईश्वर आणि ब्रह्मा आहे आणि तोच आत्मा अनंत व सिद्ध आहे.

**परमात्मदेव व आत्मदेव दोन्ही समान –**

**एक हि लक्खण–लक्खियउ, जो परु णिक्कलु देउ।**
**देहहँ मज्झहिं सो वसइ, तासु ण विज्जइ भेउ ।।१०६।।**

या उपरोक्त लक्षणांनी जो, परमात्मा युक्त असे।
अन् देहातिल आत्मा जो, या दोघातच भेद नसे ।।१०६।।

**अन्वयार्थ : (एक हि लक्खण–लक्खिउ जो परू णिक्कलु देउ)** याप्रमाणे वरील गाथेमध्ये सांगितलेल्या लक्षणांनी लक्षित जो शरीररहित परमात्मदेव आहे **(देहहँ मज्झहिं सो वसइ)** तसेच जो देहरूपी देवालयामध्ये निवास करणारा आत्मदेव **(तासु भेउ ण विज्जइ)** या दोन्हीमध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नाही.

**सामान्यार्थ :** याप्रमाणे वरील गाथेमध्ये सांगितलेल्या लक्षणांनी युक्त जे शरीररहित परमात्मदेव आहेत, तसेच जो देहरूपी देवालयामध्ये निवास करणारा आत्मदेव– या दोहोंमध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नाही.

**आत्मदर्शनाचे कार्य –**

**जे सिद्धा जे सिज्झिहिहिं, जे सिज्झहिं जिण–उत्तु।**
**अप्पा दंसणिं ते वि फुडु, एहउ जाणि णिभंतु ।।१०७।।**

सिद्ध जहाले, होतिल जे, अन्, होतच आहे भगवान।
ते निज आत्मदर्शनाने, नि:संशय जिन देव वचन ।।१०७।।

**अन्वयार्थ : (जिण–उत्तु)** श्री जिनेंद्र देवांनी सांगितले आहे – **(जे सिद्धा)** जे सिद्ध झालेले आहेत **(जे सिज्झिहिहिं)** भविष्यकाळी

जे सिद्ध होतील **(जे सिज्झहिं)** आणि जे वर्तमानकाळी सिद्ध होत आहेत **(ते वि फुडु अप्पा दंसणिं)** ते स्पष्टरीतीने आत्मदर्शनाचेच कार्य आहे – **(एहउ णिभंतु जाणि)** अशाप्रकारे तुम्ही नि:शंक जाणा.

**सामान्यार्थ :** श्री जिनेंद्रांनी सांगितले आहे – "भूतकाळी जे सिद्ध झाले आहेत, भविष्यात जे सिद्ध होतील व वर्तमानकाळी जे सिद्ध होत आहेत; ते सर्व स्पष्ट रीतीने आत्मदर्शनाचेच कार्य/माहात्म्य आहे, असे नि:शंकपणे जाणा.

**ग्रंथकर्ता आचार्यांची भावना –**

**संसारहँ भय-भीयएँ, जोगिचंद मुणिएण।**
**अप्पा-संबोहण कया, दोहा इक्क मणेण।।१०८।।**

आत्मबोध होण्यासाठी, संसाराच्या भीतीने।
दृढ चित्ते लिहिला आहे, 'योगसार' योगींद्राने।।१०८।।

**अन्वयार्थ : (संसार भय-भीयएँ)** संसार परिभ्रमणाच्या भीतीमुळे **(जोगीचंद-मुणिएण)** योगीचंद्राचार्य मुनींनी **(अप्पा-संबोहण)** आत्म-संबोधनासाठी **(इक्क मणेण)** एकाग्र मनाने **(दोहा कया)** या दोह्यांची रचना केली आहे.

**सामान्यार्थ :** संसार परिभ्रमणाच्या भीतीमुळे योगीचंद्राचार्य मुनींनी आत्म-संबोधनासाठी एकाग्र मनाने या दोह्यांची रचना केली आहे.

**पद्यानुवादकाची भावना –**

**श्री सद्गुरुला वंदुनिया , मी पद्यानुवाद केला।**
**निजरस अनुभव येण्याला, ज्ञान प्रकाश प्रगट झाला।।**

●●●

**निजरूपाचा निर्णय करुनी निजरूपातच रंगुनि जा।**
**परचिंतन अन मनन सोडुनी आत्मप्रभुला शरणचि जा।।**

# डॉ. वीरसागर जैन (दिल्ली) कृत
# योगसार–प्रश्नोत्तरीचा मराठी अनुवाद

**प्रश्न :** १. सर्वप्रथम आपण हे स्पष्ट करावे की जैन–साहित्यामध्ये योगसार नावाचे प्रमुख ग्रंथ किती तथा कोण–कोणते आहेत?

**उत्तर :** जैन साहित्यामध्ये 'योगसार' नावाचे तीन ग्रन्थ आहेत. १. मुनिराज योगिन्दु द्वारा विरचित योगसार २. आचार्य अमितगति द्वारा रचित योगसार प्राभृत ३. भट्टारक श्रुतकीर्ति द्वारा रचित योगसार।

**प्रश्न :** २. या योगसारची रचना केव्हा व कोणी केली?

**उत्तर :** या योगसार ग्रंथाची रचना साधारणतः १३०० वर्षापूर्वी मुनिराज योगिन्दुदेवानी केली आहे.

**प्रश्न :** ३. विरक्तचित्त, अध्यात्मरसिक एवं आत्मचिंतक मुनिराज योगिन्दुदेव संबंधी आपणास काय माहिती आहे?

**उत्तर :** मुनिराज योगिन्दुदेव, जिन–अध्यात्म विषयाचे उत्तम जाणकार होते. ते अत्यन्त सरल, सरस तथा सुबोध पद्धतीने सामान्य लोकांना आत्मकल्याणाचा मार्ग समजाऊन सांगण्यामध्ये समर्थ होते. साधारणतः १३०० वर्षापूर्वी त्यांनी या भारतभूमीला आपल्या चरण–कमलांनी पवित्र केले आहे. त्यानी परमात्मप्रकाश नावाच्या श्रेष्ठ तथा महान ग्रंथाची रचनापण केली आहे.

**प्रश्न :** ४. योगसारची रचना कोणत्या भाषेत केली आहे?

**उत्तर :** योगसार शास्त्राची रचना अपभ्रंश भाषेत केलेली आहे.

**प्रश्न :** ५. अपभ्रंश भाषेसंबंधी आपणास काय माहिती आहे? यथाशक्य विस्तारपूर्वक सांगावे.

**उत्तर :** अपभ्रंश भाषा प्राकृत तथा संस्कृत भाषेसारखी एक महत्त्वपूर्ण व स्वतंत्र भाषा आहे. या भाषेचा काळ सामान्यतः ५ व्या शतकापासून १५व्या शतकापर्यंत मानला जातो. आपण अपभ्रंश भाषेला संस्कृत एवं हिन्दी भाषेला जोडणारी कडी म्हणू शकतो. संस्कृत भाषा हिन्दी भाषेची आजी आहे तर अपभ्रंश भाषा आई आहे.

**प्रश्न :** ६. योगसार शास्त्राच्या नावाची सार्थकता स्पष्ट करा.

**उत्तर : (क)** जीवनाचा सार अशा योगाचे वर्णन योगसार शास्त्रात आहे; म्हणून या शास्त्राचे योगसार नाव सार्थक आहे.

**(ख)** संपूर्ण जिनवाणीचा सार म्हणजेच योग आहे. अशा योगाचे वर्णन या शास्त्रात आहे. म्हणून या शास्त्राचे नांव योगसार सार्थक आहे.

**(ग)** सार अर्थात् श्रेष्ठ अथवा उत्तम योगाचे वर्णन या ग्रंथात आहे; म्हणून याचे योगसार नाव सार्थक आहे.

**प्रश्न :** ७. योग देखील उत्तम आणि जघन्य असे दोन प्रकारचा आहे काय?

**उत्तर :** हां, योग देखील उत्तम व जघन्य दोन प्रकारचा आहे. पूर्ण योगाला उत्तम योग म्हणतात आणि अल्प योगाला जघन्य योग म्हणतात. केवलज्ञानी जीवांना उत्तम योग होतो आणि अल्पज्ञानी जीवांना जघन्य योग होतो. आत्मस्वरूपामध्ये पूर्ण लीन होणे म्हणजे उत्तम योग व आंशिक लीन होणे म्हणजे जघन्य योग होय.

**प्रश्न :** ८. जसे उत्तम आणि जघन्य योगाचे दोन भेद होतात, तसे योगाचे इतर ही भेद आहेत काय?

**उत्तर :** हां, योगाचे इतर ही अनेक भेद होऊ शकतात. पूर्ण वीतरागरूप आत्मानुभूतिच्या अपेक्षेने योग **एक** ही प्रकारचा आहे. उत्तम आणि जघन्य या प्रकारे योगाचे **दोन भेद** आहेत. उत्तम मध्यम, जघन्य-याप्रमाणे योगाचे **तीन भेद** ही करता येतात. याही पेक्षा पुढे जाऊन शब्दाच्या अपेक्षेने योगाचे **संख्यात भेद** होतात, अर्थाच्या अपेक्षेने **असंख्यात** आणि भावाच्या अपेक्षेने **अनंत भेद** देखील योगाचे होऊ शकतात.

**प्रश्न :** ९. योगाची व्याख्या काय आहे?

**उत्तर :** सर्व बाह्याभ्यन्तर विकल्पांच्या त्यागपूर्वक जेथे केवळ एक शुद्ध चैतन्यमात्र आत्म्यामध्ये स्थिरता होते, त्यालाच **योग** म्हणतात.

योग, ध्यान, समाधी, साम्य, स्वास्थ्य, चित्तनिरोध आणि शुद्धोपयोग हे सर्व पर्यायवाची शब्द आहेत.

**प्रश्न :** १०. चार घाति कर्म कोणते आहेत आणि अनंत चतुष्टय काय आहे?

**उत्तर :** चार घाति कर्माच्या अभावामुळे आत्म्यामध्ये अनंत चतुष्टय प्रगट होतात; ते पुढील प्रमाणे आहेत –

| घातिकर्म | अनन्तचतुष्टय |
|---|---|
| ज्ञानावरण | अनन्तज्ञान |
| दर्शनावरण | अनंतदर्शन |
| मोहनीय | अनन्तसुख |
| अन्तराय | अनन्तवीर्य |

**प्रश्न :** ११. योगसार दोह्यांची रचना कोणासाठी केली आहे?

**उत्तर :** संसारापासून भयभीत तथा मोक्षाची अभिलाषा बाळगणाऱ्या भव्य जीवांसाठी योगसार दोह्यांची रचना केलेली आहे. तसेच आत्मसंबोधनासाठी देखील विरक्तचित्त एवं अध्यात्मरसिक मुनिराज योगीन्दुदेवांनी योगसार शास्त्राची रचना केली आहे. **(दोहा ३ व १०८).**

**प्रश्न :** १२. संसारापासून भयभीत होणे– याचा अर्थ काय?

**उत्तर :** **(क)** आत्म्याच्या मोह-राग-द्वेषरूप परिणामांना **संसार** म्हणतात. म्हणून जे जीव आपल्या मोह-राग-द्वेषरूप दुःखद परिणामापासून भीति बाळगतात, वास्तविक तेच जीव चतुर्गतिरूप संसारापासून भयभीत आहेत.

**(ख)** मोह-राग-द्वेषरूप भावांचे फळ चतुर्गतिमध्ये परिभ्रमण आहे; म्हणून चतुर्गतिरूप परिभ्रमणालाच **'संसार'** म्हणतात. जे जीव चतुर्गति-रूप संसारापासून भीति बाळगतात तेच, संसारापासून भयभीत असतात.

(ग) मोह अथवा क्रोध, मान, माया, लोभ कषाय, हास्यादि नोकषाय एवं राग-द्वेषरूप परिणामांना सोडून विश्वातील कोणताही पदार्थ **संसार** नाही.

**प्रश्न :** १३. मोक्षासाठी लालायित होणें – याचा अर्थ काय?

**उत्तर :** मोक्षाचा अर्थ आहे – **पूर्ण स्वाधीनता** अथवा **पूर्ण निराकुलता**. ज्या जीवांच्या हृदयामध्ये पूर्ण स्वाधीनता अथवा पूर्ण

निराकुलतेची तीव्र अभिलाषा/इच्छा आहे. तेच जीव वास्तविक मोक्षासाठी लालायित आहेत; असे समजले पाहिजे.

**प्रश्न** : १४. आत्मा किती प्रकारचा आहे? आणि ते प्रकार कोण-कोणते आहेत? स्पष्ट करावे.

**उत्तर** : आत्मा तीन प्रकारचा आहे. १. बहिरात्मा, २. अन्तरात्मा व परमात्मा. (दोहा-६)

**प्रश्न** : १५. बहिरात्मा कोणाला म्हणतात?

**उत्तर** : जो जीव मिथ्यादर्शनाने मोहित आहे आणि परमात्म्याला जाणत नाही अर्थात् स्व तथा पर पदार्थाला ओळखीत नाही तो बहिरात्मा आहे. अथवा जो जीव देहादि पर-पदार्थांनाच आत्मा समजतो तो बहिरात्मा आहे. (दोहा ७ व ९)

**प्रश्न** : १६. अन्तरात्मा कोणाला म्हणतात?

**उत्तर** : जो जीव, परमात्म्याला (अथवा स्व आणि पर पदार्थांना) जाणतो आणि सम्पूर्ण पर-पदार्थांचा त्याग करतो, तो अन्तरात्मा (पण्डित आत्मा) आहे. (दोहा ८)

**प्रश्न** : १७. परमात्मा कोणाला म्हणतात?

**उत्तर** : जो निर्मल आहे, निष्कल आहे, शुद्ध आहे, जिन आहे, विष्णु आहे, बुद्ध आहे, शिव आणि शांत आहे; तोच परमात्मा आहे; असे जिनेन्द्र देवांनी सांगितले आहे. (दोहा ९)

**प्रश्न** : १८. बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्मा या तीन मध्ये कोण हेय (त्यागण्यायोग्य), कोण उपादेय (ग्रहण करण्यायोग्य) आहे? याचा खुलासा करावा.

**उत्तर** : बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्मा या तीन पैकी बहिरात्म-अवस्था सर्वथा हेय आहे आणि परमात्म-अवस्था सर्वथा उपादेय आहे. अन्तरात्म-अवस्था कथंचित् उपादेय देखील आहे आणि कथंचित् हेय देखील आहे. बहिरात्म-देशेच्या अपेक्षेने अन्तरात्म-दशा उपादेय आहे आणि परमात्मदशेच्या अपेक्षेने हेय आहे.

**प्रश्न : १९.** बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमाम्याची चर्चा कोणत्या शास्त्रामध्ये कोठे-कोठे आलेली आहे?

**उत्तर :** बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्म्याचा चर्चा मुख्यरूपाने खालील शास्त्रामध्ये पहावयास मिळते.

१. आचार्य श्रीकुंदकुंद कृत नियमसार, गाथा १४९-१५०.
२. आचार्य श्रीकुंदकुंद कृत मोक्षपाहुड़, गाथा ५.
३. आचार्य श्रीकुंदकुंद कृत रयणसार, गाथा १४१.
४. आचार्य श्रीपूज्यपादकृत समाधितंत्र, श्लोक ४,५,६.
५. कार्तिकेयस्वामीकृत कार्तिकेयानुप्रेक्षा, गाथा १९३-१९४.
६. मुनिराज योगीन्दुदेवकृत परमात्मप्रकाश, गाथा १/१३-१५.
७. मुनिराज योगीन्दुदेवकृत योगसार, गाथा ७-८-९.

**प्रश्न : २०** मार्गणास्थान कशाला म्हणतात? ते किती व कोण-कोणते आहेत? स्पष्ट करावे.

**उत्तर :** ज्या परिणामांच्या (भावांच्या) द्वारे अथवा ज्या पर्यायामध्ये जीवाला शोधले जाते, त्यांना मार्गणास्थान म्हणतात. ते पुढील प्रमाणे १४ आहेत. - १. गति, २. इन्द्रिय, ३. काय, ४. योग, ५. वेद, ६. कषाय, ७. ज्ञान, ८. संयम, ९. दर्शन, १०. लेश्या, ११. भव्यत्व, १२. सम्यक्त्व, १३. संज्ञी आणि, १४. आहारक.

**प्रश्न : २१.** गुणस्थान कशाला म्हणतात? ते किती व कोण-कोणते आहेत, नावासह सांगा?

**उत्तर :** मोह आणि योगाच्या (आत्मप्रदेशांची चंचलता) निमित्ताने जीवाच्या श्रद्धा व चारित्र गुणांच्या हीनाधिक अवस्थेला **गुणस्थान** म्हणतात. ● मोह आणि योगाच्या कारणाने जीवाच्या अन्तरंग परिणामामध्ये प्रतिक्षण होणाऱ्या उतार-चढ़ावाचे नाव **गुणस्थान** आहे.

**गुणस्थान** १४ सांगितले आहेत - १. मिथ्यात्व, २. सासादन, ३. मिश्र, ४. अविरतसम्यक्त्व, ५. देशविरत, ६. प्रमत्त-विरत, ७. अप्रमत्तविरत, ८. अपूर्वकरण, ९. अनिवृत्तिकरण, १०. सूक्ष्मसाम्पराय, ११. उपशांत मोह, १२. क्षीण मोह, १३. सयोगकेवली, १४. अयोगकेवली.

**प्रश्न :** २२. चौऱ्यांशी योनी कोण-कोणत्या आहेत?

**उत्तर :** १. नित्यनिगोद ७ लाख + इतरनिगोद ७ लाख = १४ लाख।

२. पृथ्वीकाय ७ लाख + जलकाय ७ लाख
+ अग्निकाय ७ लाख + वायुकाय ७ लाख = २८ लाख.

३. प्रत्येक वनस्पती = १० लाख.

४. द्विन्द्रिय २ लाख + त्रीन्द्रिय २ लाख
+ चतुरिन्द्रिय + २ लाख = ६ लाख.

५. देव ४ लाख + नारकी ४ लाख
+ पंचेन्द्रिय तिर्यंच ४ लाख = १२ लाख.

६. मनुष्य = १४ लाख

**कुल = ८४ लाख**

**प्रश्न :** २३. जिनेन्द्र-कथित ६ द्रव्य, ७ तत्त्व एवं ९ पदार्थ कोण-कोणते आहेत? आपण नांवासह स्पष्ट करा.

**उत्तर :** १.) **६ द्रव्य** - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल.

२.) **७ तत्त्व** - जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष.

३.) **९ पदार्थ** - जीव, अजीव, पुण्य, पाप, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष. (दोहा ३५)

**प्रश्न :** २४. वर सांगितलेल्या ६ द्रव्यामध्ये कोणते द्रव्य अचेतन व असार आहे आणि कोणते द्रव्य सचेतन तथा सारस्वरूप आहेत?

**उत्तर :** वरील ६ द्रव्यामध्ये एक मात्र जीव द्रव्यच सचेतन तथा सारभूत आहे. बाकीचे सर्व अर्थात् पुद्गलादि ५द्रव्ये अचेतन आणि असार आहेत. (दोहा ३६)

**प्रश्न :** २५. येथे जीवाला सोडून अन्य सर्व द्रव्यांना असार आणि जीव द्रव्यालाच सार असे कोणत्या अपेक्षेने सांगितले आहे?

**उत्तर :** एक जीव द्रव्याच्या आश्रयामुळे (ध्यानामुळेच) परमसुखाची प्राप्ति होते, अन्य कोणत्याही द्रव्याच्या आश्रयाने (ध्यानाने) परम सुखाची प्राप्ती होत नाही; या अपेक्षेनेच येथे जीवद्रव्यालाच सार आणि अन्य सर्व द्रव्यांना असार-असे सांगितलेले आहे. (दोहा ३६)

प्रश्न : २६. हा अज्ञानी जीव किती वेळे पर्यंत कुतीर्थामध्ये भ्रमण करीत राहील आणि धूर्तपणा करीत राहील?

उत्तर : जोपर्यंत हा जीव सद्गुरुच्या प्रसादामुळे देहरूपी देवालया-मध्ये विराजमान आपल्या आत्मदेवाला जाणनार नाही, तोपर्यंत कुतीर्था-मध्ये भ्रमण करीत राहील आणि धूर्तपणा करीत राहील. (दोहा ४१)

प्रश्न : २७. मुनिराज योगीन्दुदेवांना काय पाहून हसू येते?

उत्तर : देव तर देहरूप देवालयामध्ये विराजमान आहे; परन्तु लोग देवाला मंदिरामध्ये शोधत राहतात; हे जाणून मुनिराज योगिन्दुदेवांना हसू येते. त्याना असे वाटते की जीव जणू काही सिद्ध भगवान झालेवर देखील भूख मिटविण्यासाठी घरोघरी भीख मागत आहे. (दोहा ४३)

प्रश्न : २८. जो धर्म, जीवाला पंचम गति (मोक्षा) मध्ये पोहोचवितो तो धर्म, शास्त्र व पिंच्छी जवळ बाळगल्यामुळे प्राप्त होतो काय?

उत्तर : नाही, जो धर्म जीवाला पंचम गति (मोक्षा) मध्ये घेऊन जातो तो धर्म, शास्त्र व पिंच्छी जवळ बाळगल्यामुळे प्राप्त होत नाही. मठ-मंदिरामध्ये निवास केल्यामुळे, केशलोच केल्यामुळे अथवा तीर्थयात्रा केल्यामुळे देखील प्राप्त होत नाही. धर्म तर मोह, राग, द्वेषांचा त्याग करून-आपल्या शुद्धात्म्यामध्ये मग्न झाल्यामुळे प्रगट होतो. प्राप्त होतो. (दोहा ४७, ४८)

प्रश्न : २९. आत्मा, शुद्ध आकाशा समान आहे; याचा अभिप्राय/भाव काय आहे?

उत्तर : आत्मा, शुद्ध आकाशा समान संपूर्ण पर पदार्थापासून अलिप्त आहे. जरी आत्म्याच्या संयोगामध्ये अनंत परपदार्थ आहेत; तथापि स्वभावाच्या अपेक्षेने आत्मा संयोगामध्ये आलेल्या सर्व पर पदार्थापासून पृथक् आहे, कोणत्याही पर पदार्थाबरोबर एकमेक झालेला नाही.

(दोहा ५८, ५९)

प्रश्न : ३०. मुनिराज योगीन्दुदेवांनी जन्म धारण करण्याला कशाप्रकारे सांगितले आहे?

**उत्तर :** मुनिराज योगीन्दुदेवांनी जन्म धारण करण्याला अत्यन्त लज्जाजनक सांगितले आहे. त्यांच्या विचारानुसार नासाग्र दृष्टि धारण करून अशरीरी निज शुद्धात्म्याचा ध्यान करावयास पाहिजे, हा उपाय सांगितला आहे. (दोहा ६०)

**प्रश्न : ३१.** आत्मा, अशरीरी असून देखील स्वशरीर-प्रमाण आहे, याचा भाव काय आहे?

**उत्तर :** आत्मा, शरीर नाही; शरीरापासून भिन्न आहे. शरीर तर जड़ आणि मूर्तिक आहे; परन्तु आत्मा जड़ आणि मूर्तिक नाही. आत्मा तर चेतन आणि अमूर्तिक आहे; म्हणून आत्म्याला अशरीरी म्हटले आहे. आत्मा अशरीरी असून सुद्धा स्वशरीर प्रमाण आहे. स्वशरीरापेक्षा आकाराने लहान अथवा मोठा नाही. अन्य दर्शनकारांनी आत्म्याला वेगवेगळ्या प्रकारे मानले आहे.

१. जैनेतर दर्शनकारांनी आत्म्याला वडाच्या बीजासारखा आहे, असे मानले आहे. २. काही दर्शनकारांनी आत्मा कमल पुष्पासमान सांगितला आहे. ३. आत्म्याला दीपका समान मानला आहे. ४ आत्मा समस्त आकाशामध्ये व्याप्त असून विशालकाय मानला आहे.

वरील सर्व प्रकारच्या मान्यतेचा निराकरण करुन योगीन्दुदेवांनी आत्म्याला स्वशरीर प्रमाण असल्याचे स्पष्ट केले आहे. (दोहा ६१)

**प्रश्न : ३२.** आत्म्याने आत्म्याला जाणल्यानंतर कोणते फळ प्राप्त होते?

**उत्तर :** आत्मज्ञानी जीवाला केवलज्ञान (पूर्ण ज्ञान) देखील प्राप्त होते आणि आत्मा शाश्वत तथा अनन्त सुखसम्पन्न होतो.

**प्रश्न : ३३.** या जगामध्ये पापाला तर सर्व जीव पाप म्हणतात. काही विरळेच जीव पुण्याला देखील पाप म्हणतात-समजतात; याचा अभिप्राय काय आहे?

**उत्तर :** खरे पाहता पुण्य, पुण्यच आहे; पाप नाही. पाप, पापच आहे, पुण्य नाही. पाप-पुण्य हे दोन्ही आपआपसात भिन्न परिणाम आहेत, हे दोन्ही एक नाहीत, एक सारखे देखील नाहीत. कारण या

दोन्हीमध्ये व्यवहारनयाने कारण, रस, स्वभाव आणि फळ आदीमध्ये विशेष भेद आहे. तथापि विरळे ज्ञानी जीव आत्मज्ञानामध्ये लीन राहतात अथवा लीन होऊ इच्छितात. ते म्हणतात-समजतात की अरे! पुण्य देखील पापच आहे.

ज्ञानी लोकांच्या या कथनाचा-उपदेशाचा अभिप्राय/भाव आम्हाला समजून घेतला पराहिजे की पुण्य देखील हेय अर्थात् त्याज्यच आहे. या विषयाचा निर्णय आम्हास करावयास पाहिजे. पुण्य पापच आहे- याचा अर्थ पुण्य हिंसादीरूप पापमय आहे असे न समजता, पुण्य कर्मबंधरूप आहे, हेयच-त्यागण्यायोग्यच आहे, असा यथार्थ निर्णय तथा श्रद्धान करावयास पाहिजे. (दोहा ७१)

**प्रश्न :** ३४. जीव वास्तविक पहाता केव्हा निर्ग्रंथ होतो?

**उत्तर :** वास्तविकरूपाने विचार केला असता संसारी जीव जेव्हा मिथ्यात्वादि अंतरंग कषायरहित होतो, तेव्हा निर्ग्रंथ होतो. (दोहा ७३)

**प्रश्न :** ३५. मुनिराज योगीन्दुदेवांनी संन्यास शब्दाची व्याख्या कशाप्रकारे केली आहे?

**उत्तर :** जो जीव स्व तथा पर पदार्थांना यथार्थ रीतिने जाणतो व निसंदेह रीतीने पर-पदार्थांचा त्याग करतो, या त्यागरूप भावनेलाच वास्तविक संन्यास म्हणतात - अशाप्रकारे मुनिराज योगीन्दुदेवांनी सन्यासाची व्याख्या सांगितली आहे. (दोहा ८२)

**प्रश्न :** ३६. मुनिराज योगीन्दुदेवांच्या विचारानुसार उत्तम/पवित्र तीर्थ कोणते आहे?

**उत्तर :** मुनिराज योगीन्दु देवांच्या विचारानुसार रत्नत्रय (सम्यग्दर्शन आदि) संपन्न जीवच उत्तम तथा पवित्र तीर्थ आहे; कारण हा एक जीवच मोक्षाला कारण आहे, अन्य कोणी नाही. (दोहा ८३)

**प्रश्न :** ३७. सम्यग्दृष्टि जीव, दुर्गतिमध्ये गमन करीत नाही; याचे तात्पर्य काय आहे?

**उत्तर :** सम्यग्दृष्टि जीव दुर्गतीमध्ये गमन करीत नाही, याचे तात्पर्य खालील प्रमाणे आहे.

१. सम्यग्दृष्टि जीव पृथ्वीकायिकादि ५ प्रकारच्या स्थावर अवस्थेमध्ये जन्म घेत नाही.
२. द्विन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय आणि असंज्ञी पंचेन्द्रियामध्ये देखील सम्यग्दृष्टि जन्म घेत नाही. हा जीव तिर्यंच गतिमध्ये जातच नाही.
३. नरक गतीमध्ये जन्म होत नाही. जर सम्यक्त्व होण्याच्या अगोदर नरकायुचा बंध झाले असल्यास मात्र पहिल्या नरकामध्ये जातो.
४. भवन, व्यन्तर, जोतिषी देव होत नाही. **सम्यग्दृष्टि जीव मात्र वैमानिक देवच होतो.**
५. मनुष्य गतिमध्ये देखील स्त्री, नपुंसक होत नाही. मात्र पुरुषवेदीच होतो. (दोहा ८८)

**प्रश्न : ३८.** "जो जीव सर्व व्यवहाराला सोडून आत्मस्वरूपामध्ये रममान होतो, तो सम्यग्दृष्टि आहे" येथे व्यवहाराला सोडून याचा भावार्थ काय आहे?

**उत्तर :** रमणता दोन प्रकारची असते. १. रुचीरूप/श्रद्धारूप रमणता आणि. २. उपयोगरूप रमणता. पहिली रमणता श्रद्धा गुणाची पर्याय आहे. दूसरी रमणता चारित्र गुणाची पर्याय आहे. येथे सम्यग्दृष्टिचे प्रकरण आहे. म्हणून येथे रमणता शब्दाचा अर्थ/तात्पर्य श्रद्धारूप रमणताच समजून घ्यावयास हवे. (गाथा ८९)

**प्रश्न : ३९.** मोक्ष-सुख कसे असते?

**उत्तर :** जेव्हा जीव समस्त शुभाशुभ विकल्पानी रहित बनून परम समाधिला प्राप्त करतो, तेव्हा जीवाला ज्या अपूर्व आनन्दाचा अनुभव होतो, त्याला मोक्ष-सुख म्हणतात.

**प्रश्न :** ४०. आर्तध्यान आदि ध्यानाचे स्वरूप व भेद सांगून पिण्डस्थ, पदस्थ, रूपस्थ आणि रूपातीत - या चार ही प्रकारचे ध्यानाचे लक्षण सांगावे.

**उत्तर :** ध्यानाचे चार भेद आहेत - १. आर्त ध्यान २. रौद्र ध्यान ३. धर्म ध्यान व ४ शुक्ल ध्यान. यापैकी प्रथम दोन ध्यान अप्रशस्त

अर्थात् संसाराला कारण आहेत आणि धर्म ध्यान व शुक्ल ध्यान प्रशस्त अर्थात मोक्षाला कारण आहेत. या चार ही ध्यानांचे ४-४ प्रकार आहेत. त्यांची संक्षेपात पुढे माहिती दिली आहे.

ध्यान

- अप्रशस्त
  - आर्त ध्यान
  - रौद्र ध्यान
- प्रशस्त
  - धर्म ध्यान
  - शुक्ल ध्यान

| आर्त ध्यान | रौद्र ध्यान | धर्म ध्यान | शुक्ल ध्यान |
|---|---|---|---|
| १. इष्टवियोगज | १. हिंसानंद | १. आज्ञाविचय | १. पृथक्त्ववितर्क |
| २. अनिष्टसंयोगज | २. मृषानंद | २. अपायविचय | २. एकत्ववितर्क |
| ३. पीड़ाचिन्तन | ३. चौर्यानंद | ३. विपाकविचय | ३. सूक्ष्मक्रियाप्रतिपाती |
| ४. निदान | ४. परिग्रहानंद | ४. संस्थानविचय | ४. समुच्छिन्नक्रियानिवृत्ति |

पिण्डस्थ, पदस्थ, रूपस्थ आणि रूपातीत - हे चार ध्यान; संस्थान - विचय नावाच्या धर्मध्यानाचे प्रभेद आहेत. यार चार ही ध्यानांचे स्वरूप पुढे दिले आहे.

१. **पिण्डस्थ** - शरीरामध्ये स्थित; परन्तु शरीरापासून भिन्न ज्ञानस्वरूपी परमात्म्याचे ध्यान करणे पिण्डस्थ ध्यान आहे.

२. **पदस्थ** - णमो अरहन्ताणम् आदि मंत्ररूप पदांचे ध्यान करणे पदस्थ ध्यान होय.

३. **रूपस्थ** - पुरुषाकारादि स्वरूपामध्ये आत्म्याच्या ध्यान करण्याला रूपस्थ ध्यान म्हणतात.

४. **रूपातीत** - सर्व विचार अथवा चिंतनानी रहीत मात्र ज्ञातादृष्टारूप शुद्ध आत्माच्या ध्यानाला रूपातीत ध्यान म्हणतात.

(दोहा ९८)

**प्रश्न** : ४१. चारित्र कशाला म्हणतात व ते किती प्रकारचे आहेत?

**उत्तर** : आत्मस्वरूपामध्ये आचरण करण्याला अर्थात् आत्ममग्न-तेला चारित्र म्हणतात. आत्मस्थिरता-आत्मविशुद्धीच्या अपेक्षेने चारित्र एकच प्रकारचा आहे.